संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १३.१०.२०२६ | अंक नं. १६५ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

## डिजीटल पेमेंटवरील १५ ऑक्टोबरपासून लागू होणारा 'शुल्क नियम' दिवाळीपर्यंत लांबणीवर : एनपीसीआय

नवी दिल्ली - १५ ऑक्टोबरपासून युपीआय व्यवहारांवर लागू होणाऱ्या MDR किंवा Merchant Discount Rate बाबत १५ ऑक्टोबरपासून २००० रुपयांपेक्षा जास्त मोठ्या यूपीआय पेमेंट्सवर मर्चंट डिस्काऊंट रेट म्हणजे MDR लागू करण्याचे सरकारने जाहीर केल्यापासून व्यापाऱ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला होता आणि सणासुदीच्या तोंडावर लागू होणाऱ्या शुल्काची अंमलबजावणी पुढे ढकलण्याची मागणीही केली जात होती. व्यापाऱ्यांच्या या मागणीची दखल घेत सरकारने एक पाऊल मागे घेत निवडक पर्सन-टू-मर्चंट किंवा P2M यूपीआय व्यवहारांवरील MDR ची अंमलबजावणी आता दिवाळीपर्यंत पुढे ढकलली आहे. असे नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने १३ ऑक्टोबर रोजी जाहीर केले. याशिवाय एनपीसीआयने सांगितले की नवीन अंमलबजावणीची तारीख स्वतंत्रपणे अधिसूचित केली जाईल.

मात्र, दिवाळीनंतर युपीआय व्यवहारांवर MDR शुल्क हे तात्काळ लागू होईल, असे NPCI च्या युपीआय अँड सर्व्हिसेस स्टीअरिंग कमिटीकडून जाहीर करण्यात आले आहे. शुल्क लागू करण्याची निश्चित तारीख स्वतंत्रपणे जाहीर होईल. सणासुदीचा काळ लक्षात घेऊन निर्णयाची अंमलबजावणी पुढे ढकलण्यात आली.

PROJECT BY
Shankarleela
DEVELOPERS

P52200056362
maharera.maharashtra.gov.in



राजराजेश्वरी
अपार्टमेंट
1 & 2 BHK Flats
आगरकर मळा, अहिल्यानगर
ऑफिसचा पत्ता - ३०१, ए.पी.स्क्वेअर,
प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर
703737 4949
967392 5115

1 BHK 27 लाखांपासून
2 BHK 38 लाखांपासून

*नियम व अटी लागू

दर महिन्याचं भाडं कशाला?
यंदाच्या दसरा - दिवाळीत
स्वतःचं घर बुक करा फक्त
₹9,999*/-
मध्ये
- ऑफर कालावधी -
९ ऑक्टोबर - ९ नोव्हेंबर २०२६

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com



घटस्थापनेनंतर केडगावच्या रेणुकादेवी मंदिरात आ.संग्राम जगताप व सौ.शीतल जगताप यांच्या हस्ते सायंकाळची महाआरती करण्यात आली. यावेळी देवस्थानच्या वतीने जगताप दांपत्यांचा प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला.

# दिवाळीपूर्वी थकीत वेतन फरक मिळण्यासाठी महापालिका प्रवेशद्वारात केले 'धरणे आंदोलन'

**५०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर, पाचव्या वेतन आयोगाचा फरक, सहाव्या आयोगाचे आठ हप्ते आणि नियमित पेन्शनसाठी एल्गार**

नगर – दिवाळीचा सण तोंडावर आला असताना अहिल्यानगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने १३ ऑक्टोबर रोजी महापालिकेच्या प्रवेशद्वारात धरणे आंदोलन करण्यात आले. पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक, सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित आठ हप्ते आणि दरमहा वेळेवर पेन्शन मिळावी, या प्रमुख मागण्यांसाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून आपली व्यथा मांडली. दिवाळीपूर्वी थकीत रक्कम अदा करून पेन्शनधारकांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.



दिवाळीचा सण तोंडावर आला असताना अहिल्यानगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने महापालिकेच्या प्रवेशद्वारात धरणे आंदोलन करण्यात आले.

संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. यावेळी उपाध्यक्ष वसंत थोरात, मिलिंद वैद्य, कार्याध्यक्ष डी. यू. देशमुख, रंगनाथ गावडे, संजीव परशरामी, मधुकर खताळ, शेखर वैद्य, अन्वर शेख, मुस्ताक शेख, अनिस खान, सतीश वाघ, मंजूर शेख, गुरु टेपाळे, ज्ञानेश्वर धिरडे, दिलीप पाठक, नंदू डापसे, राजेंद्र सस्कर, रवी भारताळ, सुधाकर काशिद, हिरामन जाधव, आर.बी. कदम, गोरक्षनाथ तेलोरे, ठोकळ, अरुण घोडबंदर, प्रमोद मुळे, मुलानी, राजेंद्र बेंद्रे, सौ. रंजना भोसले, लता महाले, मिरा चव्हाण यांच्यासह सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी झाले होते. दरम्यान मनपा कामगार युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सतीश साठे यांनी या आंदोलनास पाठिंबा दिला.

महापालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वेतन आयोगाच्या थकीत रकमेचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याचे संघटनेने यावेळी निदर्शनास आणून दिले. संघटनेच्या म्हणण्यानुसार, न्यायालयीन निर्णयानुसार महापालिकेतील ५०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाचा फरक मिळणे अपेक्षित आहे. मात्र, ही रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्याचप्रमाणे सहाव्या वेतन आयोगाचे आठही हप्ते अद्याप प्रलंबित असून, या हप्त्यांची एकूण रक्कम अंदाजे ६० ते ६५ लाख रुपये असल्याचे संघटनेने सांगितले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवाकाळात महापालिकेच्या कामकाजासाठी योगदान दिले आहे. त्यामुळे नियमानुसार आणि न्यायालयीन निर्णयानुसार देय असलेली रक्कम मिळण्यासाठी त्यांना वारंवार आंदोलन करण्याची वेळ येऊ नये, अशी भूमिका संघटनेने मांडली.

दिवाळीसारखा महत्त्वाचा सण जवळ आला असताना घरखर्च, किराणा, औषधोपचार आणि इतर आवश्यक खर्चांची व्यवस्था करण्यासाठी अनेक पेन्शनधारकांना आर्थिक नियोजन करावे लागत आहे. अशा परिस्थितीत हक्काची थकीत रक्कम वेळेत मिळाली, तर ज्येष्ठ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोठा आधार मिळू शकतो. त्यामुळे प्रशासनाने या मागण्यांकडे केवळ प्रलंबित आर्थिक बाब म्हणून न पाहता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या जगण्याशी निगडित प्रश्न म्हणून लक्ष द्यावे, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

महापालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियमित पेन्शन वेळेवर मिळत नसल्याचा मुद्दाही आंदोलनादरम्यान उपस्थित करण्यात आला. पेन्शन ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार असते. वयोमानानुसार औषधोपचार, आरोग्यविषयक खर्च, घरखर्च आणि दैनंदिन गरजांसाठी त्यांना नियमित पैशांची आवश्यकता असते. मात्र, पेन्शन मिळण्यास विलंब झाल्यास त्यांचे संपूर्ण आर्थिक नियोजन विस्कळीत होते. त्यामुळे प्रत्येक महिन्याची पेन्शन त्या महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली. पेन्शनच्या तारखेबाबत निश्चित व्यवस्था करून त्याची नियमित अंमलबजावणी केल्यास सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळण्यास मदत होईल, असेही संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, महापालिकेतील कायम कर्मचाऱ्यांना ११ हजार रुपये बोनस व सानुग्रह अनुदान एकरकमी देण्याबाबत निर्णय घेतल्याबद्दल संघटनेने प्रशासनाचे आभार मानले. मात्र, कायम कर्मचाऱ्यांच्या आर्थिक मागण्यांवर निर्णय होत असताना सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतन आयोगाच्या रकमेबाबत ठोस कार्यवाही होत नसल्याबद्दल संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागण्यांनाही तितकेच महत्त्व देऊन त्यांची पूर्तता करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे यांनी सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांवर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली. ते म्हणाले की, महापालिकेच्या सेवेत अनेक वर्षे काम करून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काच्या आर्थिक लाभांसाठी आंदोलन करावे लागणे ही चिंतेची बाब आहे. सेवानिवृत्तीनंतर नियमित पेन्शनच्या माध्यमातून घरखर्च, औषधोपचार आणि इतर आवश्यक गरजा भागविल्या जातात. त्यामुळे पेन्शन वेळेवर मिळणे आणि वेतन आयोगाची थकीत रक्कम अदा होणे हे त्यांच्या दैनंदिन जीवनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. महापालिकेतील ५०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना न्यायालयीन निर्णयानुसार पाचव्या वेतन आयोगाचा फरक मिळणे अपेक्षित आहे. तसेच सहाव्या वेतन आयोगाचे आठ हप्ते अद्याप प्रलंबित आहेत. या हक्काच्या रकमा मिळण्यासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना प्रतीक्षा करावी लागत आहे. दिवाळीसारखा सण जवळ आला असताना ही रक्कम मिळाली, तर अनेक कुटुंबांना मोठा आर्थिक आधार मिळेल. त्यामुळे प्रशासनाने या प्रश्नांकडे तातडीने लक्ष देऊन थकीत रक्कम दिवाळीपूर्वी देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे त्यांनी सांगितले.

या आंदोलनाच्या माध्यमातून संघटनेने प्रशासनासमोर न्यायालयीन निर्णयानुसार ५०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाचा फरक देणे, सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित आठ हप्ते म्हणजेच अंदाजे ६० ते ६५ लाख रुपये दिवाळीपूर्वी अदा करणे आणि दरमहा पेन्शनची रक्कम ५ तारखेपर्यंत जमा करणे, या प्रमुख मागण्यांचा समावेश केला आहे.

## दुष्काळाचे संकट दूर होण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांचे केडगावच्या रेणुकामातेला साकडे

नगर – अल निनो मुळे कमी पाउस झाल्याने देशासह राज्यावर दुष्काळाचे मोठे संकट आले आहे. जेव्हा जेव्हा भक्तांवर संकटे येतात तेव्हा परमेश्वर ते दूर करण्यासाठी धाऊन येतो. त्यामुळे राज्यावर आलेले अल निनो मुळे आलेले दुष्काळाचे संकट लवकरात लवकर दूर होण्यासाठी रेणुकामातेने भक्तांवर कृपा करावी व आशीर्वाद द्यावा, असे साकडे आ.संग्राम जगताप यांनी केडगावच्या रेणुकामातेच्या चरणी घातले.

केडगावच्या रेणुकादेवी मंदिरात रविवारी विधिवत घटस्थापना झाल्यानंतर आ.संग्राम जगताप व सौ.शीतल जगताप यांच्या हस्ते सायंकाळची महाआरती करण्यात आली. यावेळी आ.जगताप यांनी भगव्या वस्त्रात देवीची मनोभावे पूजा करून प्रार्थना केली. तसेच सौ.शीतल जगताप यांनी देवीची दृष्ट काढली. महाआरती झाल्यानंतर देवस्थानच्या वतीने जगताप दांपत्यांचा प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी देवीच्या जयजयकाराच्या घोषणा देण्यात आल्या. आ.जगताप यांनी मंदिर परिसरात भाविकांशी व दुकानदारांशी चर्चा करून संवाद साधला.

यावेळी नगरसेवक जालिंदर कोतकर, सुमित लोंढे, सुजय मोहिते, मयूर बांगरे, मनोज कोतकर, विजय सुंबे, महेश दळवी, दिलीप पवार व संभाजी पवार यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## नगरमध्ये १७ ऑक्टोबरला फक्त महिलांसाठी 'लाईव्ह दांडीया नाईटचे २०२६' चे आयोजन

नगर – नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरात फक्त महिलांसाठी लाईव्ह दांडीया नाईट २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. नगर जल्लोष ट्रस्ट आणि RV GROUP OF EVENTS आयोजित असून १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता संजोग लॉन्स, सावेडी येथे हा सोहळा होणार आहे.

या दांडीया नाईटचे प्रमुख आकर्षण अभिनेत्री धनश्री कडगावकर (तुझ्यात जीव रंगला फेम – वहिनीसाहेब) असणार आहेत. त्यांच्यासोबत सेलिब्रिटी अँकर आणि गायक संदीप पाटील, छबीदार छबी... गाजलेली गायिका मुग्धा कऱ्हाडे आणि इंडियन आयडॉल फेम गायक कैवल्य केजकर लाईव्ह परफॉर्मन्सने धमाल उडवून देणार आहेत.

महिला सुरक्षेला आणि मनोरंजनाला प्राधान्य देत आयोजित या कार्यक्रमात सहभागी महिलांसाठी आकर्षक लकी ड्रॉ ठेवण्यात आला आहे. यामध्ये ९ मनमोहक पैठणी साड्या आणि ९ सोन्याच्या सुंदर नथींचा महा लकी ड्रॉ जिंकण्याची संधी मिळणार आहे. प्रवेश शुल्क केवळ ३९९ रुपये असून प्रत्येक प्रवेशिकेवर स्नॅक्स आणि पाण्याची बॉटल मोफत दिली जाणार आहे.

भिस्तबाग चौक येथे सहदेव ज्वेलर्स (०२४१–२३५५४७४), शिंगवी ज्वेलर्स (८६०५५०००२५), कुष्ठधाम रोड येथे आदिश्री कलेक्शन (७२७६८००३००), झोपडी कॅन्टीन आरएम बिझनेस हब येथे प्रतिष्ठा एथनिक (९२८४८८४४७७), प्रोफेसर चौक येथे, चाणक्य चौक येथे स्वामिनी मेकओव्हर (७६२०१९५०१३) आणि मार्केट यार्ड येथे पारस शॉपी (८०८७७३१९१७) येथे सशुल्क पासेस उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी ७७७४०७७८४४ / ९८६०६१२०४५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## निखिल जोशी यांचे अपघाती निधन



नगर – तपोवन रोड, दोस्ती बेकर्स समोरील प्लाटीनम प्लाझा येथील रहिवासी निखील नंदलाल जोशी (वय ४४) यांचा अपघात १० ऑक्टोबर रोजी झाल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारा दरम्यान १२ ऑक्टोबर रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १३ ऑक्टोबर रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी असा परिवार आहे. सरकारी वकील अबोली जोशी–कुलकर्णी यांचे ते पती होत.

## सुनीताबाई साबळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – बुरुडगाव रोड येथील रहिवासी सौ. सुनीताबाई संभाजी साबळे (वय ३९) यांचे १३ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, दीर, जावा, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे.

## सौ. विजयाबाई सवई यांचे अल्प आजाराने निधन



नगर – मानकर गल्ली, दिल्लीगेट पटांगण येथील सौ. विजयाबाई सवई (वय ६४) यांचे १३ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माणिक सवई यांच्या त्या पत्नी तर सुमीत व अमित यांच्या त्या मातोश्री होत.

## मुरलीधर अडसुळ यांचे दु:खद निधन



नगर – हिरवे कोरडा, ता.पारनेर येथील रहिवासी मुरलीधर मारुती अडसुळ (वय ८६) यांचे १२ ऑक्टोबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर हिरवे कोरडा (ता. पारनेर) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. साहेबराव, अरुण, संभाजी अडसुळ यांचे वडील तर आकाश अडसुळ यांचे ते आजोबा होत.

## दुष्काळात जलतरण तलावांचा पाण्याचा उधळपट्टीचा खेळ कशासाठी? सर्व सरकारी आणि खासगी स्विमिंग पूल तातडीने बंद करण्यात यावे

**जनावरांना पाणी नाही, ग्रामीण भागात चारा छावण्यांची मागणी; नितीन भुतारे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन**





नगर – अहिल्यानगरसह मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांमध्ये दुष्काळाची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असताना, दुसरीकडे मात्र जलतरण तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर सुरू आहे. एकीकडे ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे, तर दुसरीकडे सरकारी, खासगी, हॉटेलमधील आणि गृहसंकुलांमधील जलतरण तलावांसाठी मोठ्या प्रमाणावर पाणी खर्च केले जात आहे. दुष्काळाच्या या भीषण परिस्थितीत पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी राज्यातील सर्व सरकारी आणि खासगी जलतरण तलाव तातडीने बंद करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी नितीन भुतारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्यातील अनेक शहरांमध्ये तसेच पर्यटनस्थळांच्या परिसरात सरकारी आणि खासगी जलतरण तलाव आहेत. याशिवाय मोठमोठी हॉटेल्स, क्लब, रिसॉर्ट, व्यायामशाळा आणि काही गृहसंकुलांमध्येही जलतरण तलाव उभारण्यात आले आहेत. या तलावांमध्ये नियमितपणे पाणी भरावे लागते. पाण्याची स्वच्छता राखण्यासाठी प्रक्रिया केली जात असली, तरी पाण्याचे बाष्पीभवन, गळती, देखभाल आणि वेळोवेळी पाणी बदलण्याची गरज यामुळे पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे राज्यात पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना जलतरण तलावांसाठी होणारा पाण्याचा वापर हा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने गंभीर प्रश्न बनला आहे.

### एका बाजूला पिण्याच्या पाण्याची चिंता, दुसरीकडे मनोरंजनासाठी पाण्याचा वापर!

दुष्काळाच्या काळात पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि शेतीसाठी उपलब्ध असलेल्या मर्यादित जलसाठ्याचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक असते. ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये पाणीपुरवठ्याची व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी प्रशासनाला टँकरचा आधार घ्यावा लागतो. काही ठिकाणी विहिरी, बोअरवेल आणि स्थानिक पाणीस्रोतांची पाणीपातळी घटत असल्याने नागरिकांसमोर पाणीटंचाईचे संकट उभे राहण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत जलतरण तलावांसारख्या तुलनेने कमी प्राधान्याच्या वापरासाठी पाणी उपलब्ध करून देण्याऐवजी नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे.

जलतरण तलावांमध्ये वापरले जाणारे पाणी दर सात दिवसांनी बदलावेच लागते, असा सर्वत्र एकच नियम नसला, तरी पाण्याची गुणवत्ता, स्वच्छता आणि आरोग्यविषयक निकषांनुसार त्याची नियमित तपासणी व प्रक्रिया करावी लागते. काही परिस्थितींमध्ये पाणी बदलण्याचीही गरज भासते. तलावातील पाणी स्वच्छ करण्यासाठी आधुनिक यंत्रणा वापरल्या जात असल्या, तरी पाण्याची हानी पूर्णपणे टाळता येत नाही. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीत या तलावांचा वापर नियंत्रित करणे किंवा तात्पुरते बंद ठेवणे हा पर्याय गांभीर्याने विचारात घ्यावा, अशी भूमिका भुतारे यांनी मांडली आहे.

### जनावरांच्या घशाला कोरड; मग जलतरण तलाव सुरू ठेवण्याचा अट्टहास कशासाठी?

दुष्काळाचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि पशुपालकांना बसतो. पावसाने ओढ दिल्याने चारा उत्पादनावर परिणाम होतो आणि जनावरांसाठी चारा व पाणी उपलब्ध करून देण्याचे मोठे आव्हान निर्माण होते. जनावरांना पुरेसे पाणी मिळाले नाही, तर त्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याबरोबरच दूध उत्पादनातही घट होऊ शकते. अशा वेळी चारा छावण्या सुरू कराव्यात, पशुधनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामीण भागातून होत आहे.

एका बाजूला पशुधन जगविण्यासाठी पाण्याचे नियोजन करण्याची वेळ आली असताना दुसरीकडे मनोरंजनासाठी वापरल्या जाणाऱ्या जलतरण तलावांवर पाणी खर्च होणे ही विसंगती असल्याचे भुतारे यांनी निवेदनात नमूद केले आहे. दुष्काळाच्या काळात पाण्याच्या वापराला प्राधान्यक्रम ठरवून सर्वप्रथम पिण्याचे पाणी, पशुधन आणि अत्यावश्यक गरजांसाठी पाणी राखून ठेवले पाहिजे. त्यानंतरच अन्य वापरांचा विचार व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

### सरकारी तलावांसोबत खासगी तलावांवरही निर्बंध आणा!

केवळ सरकारी जलतरण तलाव बंद करून हा प्रश्न सुटणार नाही. खासगी क्लब, हॉटेल्स, रिसॉर्ट, सोसायट्या आणि इतर व्यावसायिक आस्थापनांमधील जलतरण तलावांवरही दुष्काळाच्या काळात निर्बंध आणणे आवश्यक आहे. संबंधित तलावांमध्ये पाणी कोणत्या स्रोतामधून आणले जाते, त्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर होतो का आणि पाण्याचा पुनर्वापर करण्याची व्यवस्था आहे का, याची तपासणी करण्याची गरज आहे.

राज्य सरकारने दुष्काळग्रस्त भागांतील परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार जलतरण तलाव तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय घ्यावा. ज्या भागांत पाणीटंचाई तीव्र आहे, तेथे पाण्याचा अनावश्यक वापर करणाऱ्या आस्थापनांवर निर्बंध घालावेत. पाण्याचा पुनर्वापर, गळती रोखणे आणि पाणी बचतीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठीही स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

### गाड्या धुण्यावर निर्बंध; मग जलतरण तलावांची तपासणी कधी?

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी वाहनधुलाईसाठी पाण्याचा वापर करणाऱ्या केंद्रांना प्रशासनाकडून नोटिसा देण्यात आल्याची माहिती पुढे येत आहे. पाणी बचतीसाठी वाहनधुलाईवर निर्बंध आणले जात असतील, तर मोठ्या प्रमाणावर पाणी वापरणाऱ्या जलतरण तलावांचाही विचार होणे गरजेचे आहे. मात्र, यासंदर्भात कोणत्या जिल्ह्यात कोणते निर्बंध लागू आहेत, याची अधिकृत माहिती घेऊनच पुढील कारवाई निश्चित केली पाहिजे.

दुष्काळ ही केवळ शेतकऱ्यांची किंवा ग्रामीण भागातील नागरिकांची समस्या नाही, तर उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. त्यामुळे पाण्याचा वापर करणाऱ्या प्रत्येक क्षेत्राने सामाजिक भान राखण्याची आवश्यकता आहे. जलतरण तलावांच्या व्यवस्थापनानेही पाणी बचतीसाठी पुढाकार घेऊन पुनर्वापराच्या यंत्रणा वापराव्यात आणि पाणीटंचाईच्या काळात प्रशासनाच्या निर्देशांचे पालन करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### मुख्यमंत्र्यांनी तातडीने निर्णय घ्यावा

अहिल्यानगरसह मराठवाडा आणि विदर्भातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन राज्य सरकारने सरकारी आणि खासगी जलतरण तलावांच्या वापराबाबत तातडीने धोरणात्मक निर्णय घ्यावा. पाणीटंचाई असलेल्या भागांत हे तलाव तात्पुरते बंद ठेवावेत, पाण्याचा अनावश्यक वापर रोखण्यासाठी स्थानिक प्रशासनाला अधिकार द्यावेत आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी भुतारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

दुष्काळाच्या काळात उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे. नागरिकांना पिण्यासाठी, शेतकऱ्यांना शेतीसाठी आणि पशुधनाला जगण्यासाठी पाणी मिळणे ही प्राथमिक गरज आहे. त्यामुळे पाण्याचा वापर मनोरंजनासाठी सुरू ठेवायचा की संकटग्रस्त नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य द्यायचे, याचा निर्णय सरकारने गांभीर्याने घ्यावा, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### घरगुती प्रथमोपचार

आपल्या घरामध्ये लहान मोठे अपघात नेहमी होत असतात. त्यावेळी घाबरून न जाता योग्य उपचार करणे खूप गरजेचे असते. स्वयंपाक घरामध्ये तेलाचा किंवा पाण्याचा चटका लागणे हा सर्वात जास्त होणारा त्रास आहे. चटका लागल्याबरोबर जखम थंड पाण्याखाली दहा ते पंधरा मिनिटे धरावी. असे केल्याने त्वचेची आग शांत होते आणि आतपर्यंत जखम खोल जात नाही. अनेक लोक चटका लागल्यावर दंतमंजन, तेल किंवा बर्फ थेट लावतात पण त्यामुळे जखम आणखी वाढते. फक्त कोरफडीचा ताजा गर किंवा कच्चा बटाटा किसून लावावा त्यामुळे थंडावा मिळतो. जर फोड आले तर ते फोडू नयेत कारण त्यामुळे पू होण्याची भीती असते. फोडावर स्वच्छ कापडाची पट्टी बांधून ठेवावी. जखम मोठी असेल आणि वेदना कमी होत नसेल तर तातडीने वैद्याकडे जावे.दुसरा त्रास म्हणजे कापून रक्त येणे. भाजी चिरताना किंवा अवजाराने हात कापला जातो. अशावेळी प्रथम जखम स्वच्छ पाण्याने धुवावी. नंतर स्वच्छ सुती कापडाने किंवा हातरुमालाने जखम घट्ट दाबून धरावी. पाच ते दहा मिनिटे दाबून धरल्याने रक्त येणे आपोआप थांबते. रक्त थांबल्यानंतर जखमेवर हळद लावावी कारण हळद ही नैसर्गिक जंतूनाशक आहे. त्यानंतर कापूस ठेवून पट्टी बांधावी. जर जखमेमध्ये काच, काटा किंवा खिळा आत गेला असेल तर तो स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. तसाच ठेवून वैद्याकडे जावे. जर रक्त खूप वेगाने येत असेल आणि थांबत नसेल तर जखमेच्या थोडे वर घट्ट कपडा बांधावा आणि ताबडतोब दवाखान्यात जावे. लहान मुलांना अशा धारदार वस्तूंपासून दूर ठेवावे. तिसरा त्रास म्हणजे पाय घसरून मचका येणे. पाय मचकल्यावर लगेच त्या जागेवर बर्फाच्या पिशवीने शेक द्यावा. पाय उंचावर ठेवून आराम करावा. सुजेसाठी हळद आणि चुना एकत्र करून लेप लावल्याने सूज कमी होते. दोन दिवसानंतर गरम पाण्यात मीठ टाकून शेक द्यावा म्हणजे वेदना कमी होतात. प्रत्येक घरामध्ये कापूस, पट्टी, हळद, कोरफड आणि जंतूनाशक औषध नेहमी तयार ठेवावे म्हणजे अचानक काही झाले तर धावपळ होत नाही आणि योग्य वेळी उपचार करता येतो.

## पाककला

### कचालू चाट

**साहित्य :** कचालू पाव किलो, तेल तळण्यासाठी, मीठ, तिखट, चाट मसाला, चिंचेची चटणी, हिरवी चटणी, बारीक चिरलेला कांदा, कोथिंबीर, लिंबू

**कृती :** कचालू स्वच्छ धुऊन कुकरमध्ये दोन शिट्ट्या करून शिजवून घ्या. थंड झाल्यावर साल काढून चौकोनी तुकडे करा. कढईत तेल गरम करून हे तुकडे लालसर होईपर्यंत तळा. तळलेले तुकडे एका ताटात काढा त्यावर मीठ, तिखट, चाट मसाला टाका. वरून चिंचेची गोड चटणी आणि हिरवी तिखट चटणी टाका. बारीक चिरलेला कांदा आणि कोथिंबीर टाका आणि वरून लिंबू पिळा. गरमागरम कचालू चाट तयार.हे उपवासाला करायचे असेल तर कांदा टाकू नका आणि शेंदेलोण वापरा.

## वास्तू

### बाथरुम एकत्र असल्यास

* बाथरूमचा दरवाजा नेहमी बंद ठेवावा. उघडा ठेवल्यास घरातील पैसा आणि आरोग्य बिघडते असे मानले जाते.

* संडासच्या दारासमोर एक छोटा पडदा लावावा. त्यामुळे दोन्ही मधील नकारात्मक ऊर्जा थांबते.

* बाथरूममध्ये एका वाटीमध्ये खडे मीठ ठेवावे. आठवड्यातून एकदा ते मीठ बदलावे. यामुळे दोष कमी होतो. बाथरूममध्ये कधीही आरसा संडास समोर लावू नये.

## सौंदर्य

* उन्हाळ्यात चेहरा काळा पडू नये म्हणून बाहेर पडताना कोरफड गर + गुलाबपाणी लावा.

* काकडीचा रस चेहऱ्यावर लावून १० मिनिटाने धुवा.

* दही + बेसनचा लेप आठवड्यातून २ वेळा लावा.

## सल्ला

कुकरची रिंग सैल झाली असेल तर १० मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा, परत फिट बसेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६

**विनायक चतुर्थी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, अनुराधा २८।०३, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** घराचे प्रश्न सुटतील. मानसिक प्रसन्नता राहील.

**वृषभ :** कर्तृत्वाला संधी मिळेल. आध्यात्मिक प्रगती.

**मिथुन :** जुने पैसे परत मिळतील. दिवस चांगला.

**कर्क :** कामे पूर्ण होतील. आरोग्य सुधारेल.

**सिंह :** कामे थोडी रखडतील. शांत राहा.

**कन्या :** सर्वांचे सहकार्य मिळेल. निर्णय यशस्वी.

**तूळ :** आत्मविश्वास वाढेल. प्रभाव पडेल.

**वृश्चिक :** कामात यश. मन समाधानी राहील.

**धनू :** खर्च वाढेल. उधारी देऊ नका.

**मकर :** वैवाहिक जीवनात गोडवा. निर्णय अचूक.

**कुंभ :** खर्चावर नियंत्रण ठेवा. वस्तू सांभाळा.

**मीन :** व्यवसायात फायदा. प्रवासाचे योग.

# शब्दगंध क्र. ७५३६

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७५३५ चे उत्तर



**आडवे शब्द :** - १) काँग्रेस पक्षाच्या नेत्या तथा अध्यक्ष ४) पत; ओंजळ ६) खेळातील भिडू; किरकोळ नोकर; मित्र; सोबती ७) गरीब; प्रामाणिक; नीतिमान ८) गोष्ट; कहाणी १०) जड; पत असलेला; प्रतिष्ठित १२) रेषा; रेघ १४) मग्न; रममाण; लीन; गुंग १५) डोंगर वगैरेतील खोलगट जागा; घळ १६) बंगाल १८) कोणतेही सामान; शेतातून येणारे धान्य १९) खात्री; भरवसा; विश्वास २२) एकसारखे बोलणे; बकबक; बडबड २४) लग्नानंतर निघणारी वधुवराची मिरवणूक २५) गुच्छ; झुबका; घड; जुडगा (द्राक्षांचा वगैरे)

**उभे शब्द :-** १) सोसणारा; सहन करणारा २) यज्ञ; मख; यजन ३) अर्जुनाचे धनुष्य ४) वर्षाच्या बोलीने ठेवला जाणारा नोकर ५) सर्कस वगैरेतील शरीराच्या विशिष्ट हालचाली ७) छोटा; लहान; लघू ९) हवा खाण्यासाठी जागा बदलणे ११) पुरुषाचे एक नाव; जय मिळविणारा; विजयी १३) झाडावर वगैरे इकडून तिकडे हिंडणारा एक छोटा प्राणी; लोणच्यातील क्षार १५) कमाई करणारा; मिळविणारा १७) उशिराने पिकणारे धान्य १९) पलंग; बाज २०) थोडे; अल्प; म्हातारपण २१) माजलेला; मुजोर; उन्मत्त २३) इंद्राचे आयुध

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** मोठं होण्यासाठी मोठ्या लोकांशी नाही, तर मोठ्या विचारांशी मैत्री करा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### सावली कधी लहान कधी मोठी का होते?

आपल्या आयुष्यात सावली ही आपली कायमची सोबती आहे. आपण जिथे जाऊ तिथे ती आपल्या बरोबर असते. पण ही सावली कधीच एकसारखी राहत नाही. कधी ती इतकी लांब होते की रस्त्याच्या पलीकडे जाते तर कधी ती इतकी लहान होते की ती पायाखालीच लपते. हा चमत्कार कसा घडतो हे समजून घेणे म्हणजे प्रकाशाचे विज्ञान समजून घेणे आहे. यामागे दोन महत्वाची कारणे आहेत एक म्हणजे प्रकाश कोणत्या कोनातून पडतो आणि दुसरे म्हणजे प्रकाश देणारी वस्तू किती अंतरावर आहे. आपल्याला सावली दिसते याचे कारण प्रकाशाला एखादी अपारदर्शक वस्तू अडवते.

सूर्य हा आपला सर्वात मोठा प्रकाशाचा स्त्रोत आहे. सूर्यापासून येणारा प्रकाश जेव्हा आपल्या शरीरावर पडतो तेव्हा आपले शरीर तो प्रकाश पुढे जाऊ देत नाही आणि त्याच्या मागच्या बाजूला अंधार तयार होतो त्यालाच आपण सावली म्हणतो. सकाळची वेळ घ्या. सकाळी सहा सात वाजता सूर्य पूर्व क्षितिजावर असतो. तो जमिनीपासून अगदी जवळ असतो. त्यामुळे त्याचे किरण जमिनीला समांतर आणि तिरपे पडतात. तिरपा प्रकाश जेव्हा आपल्या अंगावर पडतो तेव्हा आपली सावली पश्चिमेकडे खूप लांबवर पसरते. याचे कारण प्रकाशाचा मार्ग तिरका असला की अडथळ्यामागचा अंधाराचा भाग जास्त लांब होतो.जसजसा दिवस वाढतो तसतसा सूर्य आकाशात वर सरकतो. नऊ वाजता, दहा वाजता सूर्य वर आल्यावर त्याचे किरण थोडे सरळ होऊ लागतात. त्यामुळे सावलीची लांबी कमी होऊ लागते.

दुपारी बारा वाजता सूर्य अगदी माथ्यावर येतो. या वेळी किरणे आपल्या डोक्यावरून अगदी सरळ खाली पडतात. त्यामुळे सावलीला लांब पसरण्यासाठी जागाच मिळत नाही. ती आकुंचन पावून पायाखाली एका छोट्या काळ्या ठिपक्यासारखी दिसते. या वेळी जर आपण मोकळ्या मैदानात उभे राहिलो तर आपल्याला वाटेल की आपली सावलीच नाहीशी झाली आहे. दुपारनंतर पुन्हा उलटा प्रवास सुरू होतो. सूर्य हळूहळू पश्चिमेकडे झुकू लागतो. पुन्हा किरणे तिरपी होतात. तीन वाजता सावली थोडी लांब होते. पाच वाजता ती आणखी लांब होते आणि सूर्य मावळताना तर ती अगदी प्रचंड मोठी होते. याचाच अर्थ प्रकाश जेवढा तिरपा तेवढी सावली लांब आणि प्रकाश जेवढा सरळ तेवढी सावली लहान.हा नियम फक्त सूर्यालाच नाही तर घरातील दिवा, मेणबत्ती किंवा टॉर्च यांनाही लागू होतो. तुम्ही एक प्रयोग करून पहा. रात्रीच्या वेळी भिंतीजवळ टॉर्च धरा आणि तुमचा हात टॉर्चसमोर ठेवा. जेव्हा टॉर्च हाताच्या अगदी जवळ असेल तेव्हा भिंतीवर हाताची सावली खूप मोठी दिसेल. जसजसा टॉर्च लांब नेऊ तसतशी सावली लहान होत जाईल. यावरून अंतराचा परिणाम कळतो. वस्तू प्रकाशाच्या जवळ असेल तर सावली मोठी आणि प्रकाशापासून लांब असेल तर सावली लहान होते.आपल्या पूर्वजांनी याच ज्ञानाचा उपयोग करून सूर्य घड्याळ बनवले होते.

जमिनीत एक सरळ काठी रोवायची आणि तिच्या सावलीची लांबी आणि दिशा पाहून वेळ ठरवायची. सकाळी लांब सावली, दुपारी लहान सावली आणि संध्याकाळी पुन्हा लांब सावली यावरून अचूक वेळ समजत असे.काही वेळा सावली फिकट तर काही वेळा गडद का दिसते असा प्रश्नही पडतो. जेव्हा प्रकाश एकाच ठिकाणाहून येतो तेव्हा सावली गडद काळी दिसते. पण जेव्हा दोन तीन ठिकाणाहून प्रकाश येतो तेव्हा सावली फिकट होते. कारण एका बाजूचा प्रकाश दुसऱ्या बाजूची सावली थोडी प्रकाशित करतो.म्हणून सावली लहान मोठी होणे हा काही जादूचा खेळ नाही तर तो प्रकाश, वस्तू आणि जमीन यांच्यातील अंतर आणि कोन यांचा सुंदर संबंध आहे. हा संबंध समजला की आपल्याला प्रकाशाचे विज्ञान अधिक सोपे वाटू लागते.

## वेळेची किंमत

एका जंगलात एक म्हातारा सुतार राहत होता. त्याच्याकडे एक जादूची कुऱ्हाड होती. त्या कुऱ्हाडीला तो म्हणाला की मला एका दिवसात एक सुंदर घर बांधून दे.

कुऱ्हाड म्हणाली, मी घर बांधून देईन पण माझी एक अट आहे. मी तुला रोज फक्त ८ तासच वेळ देईन. त्या ८ तासात तू माझ्याकडून जेवढे काम करून घेशील तेवढेच घर तयार होईल. एकदा वेळ संपली की मी थांबेन. सुतार खुश झाला. पहिल्या दिवशी त्याने पहिले २ तास गप्पा मारण्यात आणि आळस करण्यात घालवले. मग ४ तास काम केले. शेवटचे २ तास तो पुन्हा झोपला. त्या दिवशी घराची फक्त एक भिंत उभी राहिली.

दुसऱ्या दिवशी सुताराला वाटले आज जास्त काम करू. पण त्याने पुन्हा तेच केले. वेळ फुकट घालवला.असे ६ दिवस गेले. सातव्या दिवशी कुऱ्हाडीने सांगितले आज शेवटचा दिवस आहे. त्या दिवशी सुतार सकाळी लवकर उठला. त्याने एक मिनिटही वाया घालवला नाही. सतत ८ तास तो काम करत राहिला. त्या दिवशी त्याचे अर्धे घर पूर्ण झाले. पण आता वेळ संपली होती. त्याचे घर अर्धवटच राहिले. पावसाळा आला तेव्हा त्याचे अर्धवट घर गळू लागले. तेव्हा कुऱ्हाड म्हणाली, बघितलेस, मी तुला रोज सारखीच वेळ दिली होती. तू पहिले दिवस वाया घालवलेस म्हणून तुझे घर अपूर्ण राहिले. जर तू पहिल्या दिवसापासून प्रत्येक तासाचा उपयोग केला असतास तर आज तुझे घर महाल झाले असते. सुताराला आपली चूक कळली.

तात्पर्य : आयुष्य सुद्धा त्या कुऱ्हाडीसारखेच आहे. देवाने सगळ्यांना रोज २४ तास सारखेच दिले आहेत. जो वेळेचा उपयोग करतो त्याचे आयुष्याचा महाल तयार होतो आणि जो वेळ वाया घालवतो त्याचे आयुष्य अर्धवट राहते.

# आत्मशक्ति



## अध्यात्मिक शक्ती

कारण त्याला कीड आणि उधई लागते. चोर त्याच्यावर नजर ठेवतात व चोरतातही! आपल्यासाठी परलोकी धन जमवा, तेथे कीड व उधई लागण्याची, गंज लागण्याची भीती नसते. तेथे त्या धनावर चोरांची नजर नसते व चोरीही होत नाही. जेथे तुमचे धन असते तेथे तुमचे मनही अडकून राहते. म्हणून परलोकी धन जमवा.''(मत्ती ६.१९-२१)बाह्य सौंदर्य वाढत्यानुसार कमी कमी होत जाते. जर आमचा आत्मा सुंदर नसेल तर चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्यानंतर फारच कमी लोक आमच्या आत्म्यावरील आवरण ओढले जातील.

ज्ञान दरवर्षी बदलत रहाते, म्हणून ते अस्थायी ठरते. आज आम्ही जे नवे म्हणून वाचीत असतो ते नंतर जुने, कालबाह्य ठरते. विज्ञानाचे आजचे शोध उद्या निरुपयोगी ठरतील. धनाची किंमत अर्थव्यवस्थेनुसार बदलत रहाते. भागपत्रांचे व कर्जरोख्यांचे भाव शून्यवत् ठरू शकतात अथवा कोणा एका भयंकर रोगावर आमचा सारा पैसा खर्च होतो. लक्ष्मी चंचल असते. ह्याचाच अर्थ धनाचा अभिमान कोणत्या वेळी साफ गळून पडेल ते सांगता येत नाही.आमच्या आत्म्यात अहंकाराला जागा नसते. म्हणून तो जीवनाच्या चढउताराबाबत भय बाळगीत नाही. आमचा आत्मा जागृत झाला म्हणजे समाधानी ठेवण्यासाठी वस्तुवर सांसारिक आपण अवलंबून राहत नाही. आत्मा परमेश्वराशी एकरूप असतो पण त्याच्या अवस्थेप्रमाणेच आम्हीही सदासर्वदा अगदी सुखासमाधानात राहतो.

अहंकार अनेक रूपे धारण करतो. असे सांगितले जाते की तपस्वी आणि संन्यासी ह्यांना ज्याच्यावर विजय मिळवायचा असतो असा त्यांचा अखेरचा शत्रु म्हणजे अहंकार! ते सांसारिक वासना, क्रोध, लोभ आणि मोहाचा त्याग करू शकतात. पण जर ह्या वस्तूंचा त्याग करण्यावर त्याने गर्व केला तर तो अहंकाराच्या जाळ्यात अडकतो. अशा रीतीने लपून छपून अहंकार आपले घाणेरडे डोके वर काढत असतो.

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

## नाती घट्ट विणू या

आतून बाहेरच्या दिशेने रूपांतरण

सुरेश ओबेरॉय : प्रेम हा आपला उपजत गुण आहे. तरीही या मालिकेतून आपण त्या गुणांचं पुनरुज्जीवन कसं करायचं याचे मार्ग शोधत आहोत.

शिवानीदीदी : याचं कारण आपण गेली अनेक वर्ष प्रेमस्वरूप असण्याच्या गुणधर्माविरुद्ध कृती करत आहोत. आपण याकडे असं पाहू या - आरोग्य आपल्यासाठी नैसर्गिक असतं पण जर आपण आपली काळजी घेतली नाही तर आपल्याला आजार होतात. जसजसा काळ पुढे जातो तसतसं पूर्णतः निरोगी राहणं शक्यच नाही असं आपण समजायला लागतो. प्रेमस्वरूप असण्याबाबतही असंच आहे. आपला मूळ गुण अनुभवण्यासाठी आपण आजकाल इतरांच्या प्रशंसेवर इतकं अवलंबून राहतो की आपली निवड इतरांनी मंजूर केल्यानंतरच आपल्याला हायसं वाटतं.

सुरेश ओबेरॉय : तुम्ही नेहमी आग्रह धरता की, आपल्या आयुष्याच्या प्रवासात इतर लोक आपल्याशी कसेही वागले तरीसुद्धा आपण आपल्यासाठी निवडलेल्या गोष्टींचा वापर करून स्वतःचा बचाव करायलाच हवा. एक कुशल चालक अत्यंत कौशल्याने गाडी चालवतोच; शिवाय रस्त्यावर अविचाराने गाडी चालवणाऱ्यांपासून स्वतः चा बचावही करतो.

शिवानीदीदी : हो. आपल्या मार्गात येणाऱ्या प्रत्येक माणसामध्ये न अडकणं खूप महत्त्वाचं आहे. स्वतःची गाडी चालवण्याकडे लक्ष न देता इतरांच्या गाडीउजवे आतून बाहेरच्या दिशेने रूपांतरणचालवण्यावर टिप्पणी करायला लागलो तर नक्कीच आपला अपघात होईल. हीच समज आपल्याला आयुष्यातही वापरायची आहे.

सुरेश ओबेरॉय : प्रेम हा नैसर्गिक गुण आहे,

पण ह्या सजगतेमध्ये राहण्याऐवजी आपण आपल्या आजूबाजूच्या जवळजवळ प्रत्येक माणसा मुळे प्रभावीत होतो. असं का होतं?

शिवानीदीदी : कारण आपल्या आयुष्याचा रिमोट कंट्रोल आपण इतरांच्या हातात दिला आहे. याची सुरुवात अगदी लहानपणापासूनच होते.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

जावई : सासूबाई, तुम्ही माझ्या बायकोला स्वयंपाक शिकवलाच नाही का?

सासू : का रे? काय झालं?

जावई : रोज म्हणते, आईच्या हातच्या चवच येत नाही आणि मला उपाशी ठेवते!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* महाराष्ट्राचे पहिला उपमुख्यमंत्री कोण?

– नाशिकराव तिरपुडे

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

अशा प्रकारे किचकट, त्रासदायक रुग्णांनासुद्धा संयुक्त अशा उपचारपद्धतीमुळे अपत्यप्राप्ती होऊ शकते. माझी सर्वांना एकच विनंती आहे की, टेस्टट्यूब बेबी सारखे खर्चिक, शरीरामध्ये बरेच हार्मोन्सल बदल करणारे उपचार करण्याआधी एकदा तरी संयुक्त उपचारपद्धतीकडे वळावे. यातून तुम्हाला अपत्यप्राप्तीचे सुख नक्कीच मिळू शकते

शुभांगी ही मुंबईला राहते. गर्भपात झाला म्हणून माहेरी नगरला आराम करण्यासाठी आली होती. कोणाशीच बोलत नाही, सारखी रडत असते, टेन्शनमध्ये राहते म्हणून घरच्यांनी तिला माझ्याकडे समजावून सांगण्यासाठी आणले होते. ओ.पी.डी. मध्ये आल्यानंतर मी तिला काही विचारण्याच्या आतच तिने रडायला सुरुवात केली. मी त्या वेळी तिला शांत केले व 'रडू नकोस. तुझे पुढचे बाळ नक्कीच चांगले होईल' असे आश्वासन दिले व तिला मागचा इतिहास विचारण्यास सुरुवात केली. तेव्हा ती मला सांगू लागली. 'डॉक्टर, आतापर्यंत माझा तीन वेळा गर्भपात झाला आहे. २ ते अडीच महिन्यांपर्यंत गर्भ हा चांगला असतो. बाळाचे ह्दयाचे ठोके, वाढ एकदम चांगली असते व त्यानंतर अचानकच माझ्या पोटात दुखायला लागते.

सोनोग्राफी केली असता बाळ पोटात दगावले आहे असे समजते. मला आता बाळ होईल की नाही? मी कधी आई होऊ शकेन का? याबद्दलच खात्री वाटत नाही'. तिचे ऐकून घेतल्यानंतर मी तिला विचारले, 'इतक्या वेळा गर्भपात झाला, तर तू रक्ताच्या काही तपासण्या केल्या होत्यास का? तसेच तुम्ही पती-पत्नीने कधी गर्भ राहण्याआधी पंचकर्म करून घेतले आहे का?

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वारकरी संप्रदायाला हायजॅक करण्याच्या प्रयत्नांविरोधात प्रतिक्रांती करण्यासाठी पुढाकार घ्यावा : अभिजीत कांबळे

नगर – सध्या वाचकांपेक्षा रिल्स व शॉर्ट व्हिडिओ पाहणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. पुढील पिढीला दिशा देण्यासाठी प्रभावी आणि चांगल्या व्हिडिओंसारख्या माध्यमांतून समाजात सकारात्मक बदल घडवता येऊ शकतात. सोशल मीडियावरील चुकीच्या गोष्टी थांबविण्यासाठी हस्तक्षेप करून समाजाला चांगल्या गोष्टी देणे आणि समाजपरिवर्तनासाठी माध्यम म्हणून काम करणे आवश्यक आहे. पुरोगामी असलेल्या वारकरी संप्रदायाला हायजॅक करण्याचे काम प्रतिगामी शक्ती करत आहेत. वारकरी संप्रदायात घुसून त्याचा कब्जा घेण्याचे काम सुरू असून, त्याविरोधात प्रतिक्रांती करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागणार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अभिजीत कांबळे यांनी केले.


'दिंडी : वे ऑफ लाइफ' या निरीक्षणात्मक लघुपटाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित फिल्म फेस्टिव्हलमध्ये निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर शहरातील सकल भारतीय समाजाच्या वतीने लघुपटाचे दिग्दर्शक भैरवनाथ वाकळे व उज्वला वाकळे यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.

'दिंडी : वे ऑफ लाइफ' या निरीक्षणात्मक लघुपटाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित फिल्म फेस्टिव्हलमध्ये निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर शहरातील सकल भारतीय समाजाच्या वतीने लघुपटाचे दिग्दर्शक भैरवनाथ वाकळे व उज्वला वाकळे यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. यावेळी मानपत्राचे वाचन सॅम्युअल वाघमारे यांनी केले. शहरातील रहेमत सुलतान सभागृहात या लघुपटाचे स्क्रीनिंग आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात अभिजीत कांबळे बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सिने अभ्यासक प्रा. संदीप गिऱ्हे उपस्थित होते.

अभिजीत कांबळे म्हणाले की, २०१४ पासून वातावरण बदलले. अहिल्यानगरमध्ये चळवळीतील कार्यकर्ते २०१४ पूर्वी आणि त्यानंतरही प्रस्थापितांविरोधात चळवळ चालवतात, हे विशेष आहे. आपले म्हणणे मांडण्यासाठी नवीन फॉर्म निवडताना व्हिडिओ हे सर्वोत्तम माध्यम ठरत आहे. सामाजिक व परिवर्तनवादी विषय लिहिण्यापेक्षा व्हिडिओचा परिणाम अधिक होतो. वाचन कमी होत असल्याची खंत व्यक्त करत त्यांनी सांगितले की, नवीन पिढीदेखील सोशल मीडियावर शॉर्ट व्हिडिओ पाहणे पसंत करते. तरुण वर्गापर्यंत पोहोचण्यासाठी हे उत्तम माध्यम आहे. तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रमुख पाहुणे सिने अभ्यासक प्रा. संदीप गिऱ्हे यांनी चित्रपटसृष्टीच्या ऐतिहासिक प्रवासाचा आढावा घेतला. १९०० पूर्वीच्या फिल्मी दुनियेपासून त्यांनी आपल्या विवेचनाला सुरुवात केली. नाटकाची सुरुवात, नाटकाचे चित्रीकरण करून ते थिएटरमध्ये दाखविणे, विविध ठिकाणी चित्रीकरण करणे, कथा लेखन आणि कथेनंतर स्क्रिप्टचा विकास, अशा टप्प्यांतून फिल्म ते सिनेमा हा प्रवास कसा घडत गेला, हे त्यांनी सांगितले.

१९१३ नंतर सिनेमात कसे बदल झाले, पौराणिक चित्रपटांनंतर १९३२ पासून चित्रपटांमध्ये आवाज कसा आला, याची माहिती त्यांनी दिली. भारत ही जगातील एकमेव अशी सिनेसृष्टी आहे, जिथे चित्रपटांमध्ये गाणी असतात, असे त्यांनी नमूद केले. १९३२ ते १९४८ या कालखंडातील चित्रपटसृष्टीतील चढ–उतार आणि वास्तव मांडणारे चित्रपट पुढे कसे आले, यावरही त्यांनी प्रकाश टाकला. चित्रपट ही चित्रांची भाषा असून, सिनेमात बोलले काय जाते यापेक्षा दाखवले काय जाते, याला अधिक महत्त्व आहे, असे प्रा. गिऱ्हे यांनी स्पष्ट केले. सध्या चित्रपटांमध्ये राजकारणाचा प्रवेश होऊन प्रचारकी भूमिका मांडणारे आणि प्रोपगंडा निर्माण करणारे चित्रपट तयार होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे, ही शोकांतिका असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महेबूब सय्यद यांनी केले. यावेळी अ‍ॅड. श्याम असावा, सुभाष वारे, युनुस तांबटकर, शाकीर शेख, संध्या मेढे, डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, प्राध्यापक सॅम्युअल वाघमारे, अ‍ॅड. संतोष गायकवाड, प्रा. मेहबूब सय्यद, इंजि. अभिजीत वाघ, आसिफ खान दुलेखान, वैदेही बल्लाळ, सायली तोरणे, नेहाल घोडके, प्रकाश झावरे, सुधीर लंके, वैशाली तोडमल, वर्षा थोरवे, उज्ज्वला वाकळे, समृद्धी वाकळे, ललिता केदारे, इस्थर रोल्हुपूई, खुशी राजभर, मुस्कान शेख, फिरोज शेख, ऋतुजा शिंदे, अ‍ॅड. विद्या शिंदे, मरयम सय्यद, समी सय्यद, रामदास वागस्कर, अर्जुन बोरुडे, संतोष गायकवाड, मोहसीन शेख, विजय केदारे, अतुल देठे, संजय वाघ, किरण डहाळे उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## बुद्धी स्वत:भोवतीच फिरू नये

आपण आगगाडीने प्रवास करतो. खिडकीतून दूरवर पाहतो. क्षितिजाजवळ रांगेने उभी झाडे न्याहाळतो. क्षणात धावती गाडी काय जादू करते ? ती झाडे फेर धरून गोल फिरत आहेत असे दिसते. हळूहळू ती झाडे मागे पडतात. दुसरी समोर येतात आणि तीही अशीच वर्तुळाकार फिरतात. गाडीत एका जागी बसलेलो आपण आणि आपल्याभोवती गोल फेर धरणारी ती झाडे. माणसाला सगळेच जगच आपल्याभोवती फेर धरून आपल्या तालावर फिरवते असे वाटते. तो तसे समजूनच वागतोदेखील. आपणच महत्त्वाचे. जग आपल्याच मेहेरबानीवर चालते, असे त्याला वाटते.




शहाण्याने अशी आपल्याभोवतीच फिणारी बुद्धी इतरत्र वळवावी, असे विदुर नीती अर्जुनाला सांगते.

संसारात गुरफटलेल्या माणसाची निर्णय करणारी बुद्धी आपल्याभोवती फिरते. केवळ स्वार्थ पाहते. स्वार्थातला अर्थ अनर्थकारी होतो. व्यर्थ म्हणजे मानवकल्याणाचे कर्तव्य. सर्वांच्या सर्वगत प्रगतीचे उन्नत शिखर, हेच गंतव्य. त्यामुळेच प्राप्त होतो जीवनाला अर्थ. असा अर्थ अंगीकारावा. केवळ इंद्रियजन्य सुखासाठी वखवखलेल्या वासनांचा त्या अर्थासाठी त्याग करावा असे करतो तोच शहाणा म्हणावा. त्याचाच बुद्धिमान म्हणून गौरव करावा. स्वत:पुरतेच पाहणारा मूढ म्हणावा.

समर्थ रामदास म्हणतात.

ज्ञान बोलोन करी स्वार्थ कृपणा ऐसा साची अर्थ।
अर्थासाठी लावी परमार्थ तो एक पढतमूर्ख ।।।

खोटी बुद्धी वापरायची आणि आपली पोळी पिकवायची ही लक्षणे मूर्खाची. त्याने केवळ स्वार्थ पाहयचा. मग तो आपमतलबी करंटा म्हणवायचा. उदार मन नसायचे. ते एखाद्या कृपणाचेच जणू वाटायचे. जगाचे भले स्वत:च्या भल्यासाठी उधळायचे? एकट्यासाठी जगाला लाथाडायचे? फक्त मला सुख मिळावे, बाकी जग जाईना का दु:खाच्या खाईत, ही वृत्त शिकलेल्यांची देखील असायची? मग ती विद्या काय कामाची. ही तर व्याख्यान पढतमूर्खाची.

आपल्यापुरताच विचार, स्वार्थी विचार, आपलीच फजिती करवतो. एक प्रवचनकार आपण खूप छान प्रवचन करतो, या गर्वात होता. गावातली सगळी प्रतिष्ठित मंडळी प्रवचनाला यावीत व त्यांनी आपली स्तुती करावी, हीच त्याची इच्छा. तिचाच पुरवायचा तो पिच्छा. एकदा त्याला कळले की, गावातला एक वकील मात्र आपल्या प्रवचनाला येत नाही. प्रवचनकार त्या वकिलाकडे गेला. तुम्हीच तेवढे प्रवचनाला का येत नाही? माझ्या कीर्तीत तेवढीच उणीव राहते, अशी त्याने मनधरणी केली. तुमचा वेळ जाईल, म्हणून मी त्यांची भरपाई करतो. असे म्हणून वकिलाला त्याने द्रव्यदेखील दिले. शेवटी तो वकील एक दिवस प्रवचनाला आला. प्रवचनकाराने त्याचा उल्लेख केला. आता माझ्या लौकिकात कुठलाही उणेपणा नुरला. म्हणून स्वत:चाच गौरव करून बसला. प्रवचन संपले. लगेच सर्वांसमक्ष प्रवचनकाराने वकिलाला विचारले, आपल्याला प्रवचनात आनंद आला? वकील म्हणाला, हो एवढा आनंद पूर्वी कधीही मी नव्हता अनुभवला. प्रवचनकार खुश झाला. सगळ्या श्रोत्यांकडे त्याने गर्वाने नजर फेकली. पण वकील लगेच म्हणाला, एवढी मोठी आनंदाची अनुभूती आली. कारण तुमच्या प्रवचनात मला खूप गाढ झोप लागली. घरी एवढी शांत झोप कधीच मिळाली नव्हती.

– किशोर गांधी

# जागतिक हात धुवा दिनानिमित्त १५ ऑक्टोबरला विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचे आवाहन

नगर – जागतिक हात धुवा दिनानिमित्त १५ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शाळा व अंगणवाड्यांमध्ये विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचे आवाहन जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले आहे.




स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस जागतिक हात धुवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून वैयक्तिक स्वच्छता, हात धुण्याचे महत्त्व आणि स्वच्छतेच्या सवयींबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना हात धुण्याची योग्य पद्धत, हात धुण्याचे फायदे आणि स्वच्छतेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांकडून हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून घेणे, ग्रामस्तरावर जनजागृती करणे, समुदाय बैठका आयोजित करणे आणि शाळांमध्ये जनजागृती रॅली काढणे यांसारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमांचे नियोजन गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी आणि बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी आपापल्या स्तरावर करावे. राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा सचित्र अहवाल १९ ऑक्टोबर पर्यंत जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या संबंधित कार्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

स्वच्छतेच्या चांगल्या सवयी अंगीकारून निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी जागतिक हात धुवा दिनानिमित्त जिल्ह्यात व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन राजेंद्र देसले प्रकल्प संचालक जलजीवन यांनी केले आहे.

# 'ट्रेकॅम्प'चे तीन सदस्य झाले अधिकृत 'टूर गाईड'

## नाशिक येथे प्रमाणपत्र वितरण, शासनाच्या संकेतस्थळावर होणार नोंद

नगर – स्थानिक पर्यटन स्थळांवर पर्यटकांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन मिळावे आणि पर्यटन संवर्धनाला गती मिळावी या उद्देशाने महाराष्ट्र पर्यटन संचालनालय व इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम व ट्रॅव्हल मॅनेजमेंट (ग्वाल्हेर) यांच्या वतीने विशेष पर्यटक मार्गदर्शक (टूर गाईड) प्रशिक्षण वर्ग घेतला जातो. त्यात नगरच्या 'ट्रेकॅम्प' या प्रतिथयश गिर्यारोहक संस्थेच्या तीन सदस्यांनी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. या प्रशिक्षणार्थींना नाशिक येथे काल प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. हे तिघेही आता शासनाच्या पर्यटन संचालयनालयाचे अधिकृत टूर गाईड झाले आहेत.


ग्वाल्हेर येथे टूर गाईड प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल ट्रेकॅम्पचे सदस्य करिश्मा कोठारी–जोशी, पिपिलिकेश्वर जाधव व साहील बेदमुथा यांना पर्यटन उपसंचालक नंदकुमार राऊत यांच्या हस्ते नाशिक येथे गौरविण्यात आले. या वेळी ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी उपस्थित होते.

पर्यटन संचालनालयाच्या नाशिक उपसंचालक कार्यालयामार्फत आयोजित या शिबिरात आयआयटीटीएम, ग्वाल्हेर येथील तज्ज्ञ प्रशिक्षक चंद्रशेखर बरुआ यांनी मार्गदर्शन केले. या अभ्यासक्रमादरम्यान पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिक कौशल्ये, पर्यटकांशी संवाद, ऐतिहासिक व स्थापत्य वारशाचे महत्त्व, सुरक्षा आणि प्रत्यक्ष 'फील्ड व्हिजिट'द्वारे स्थळांचा अभ्यास अशा विविध पैलूंवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात नगरच्या ट्रेकॅम्प संस्थेचे करिश्मा कोठारी–जोशी, पिपिलिकेश्वर जाधव व साहील बेदमुथा हे तीन सदस्यही सहभागी झाले होते. त्यांनी प्रशिक्षणानंतरच्या मूल्यमापन चाचणीत नेत्रदीपक यश संपादन केले. या प्रशिक्षणार्थींना काल (शुक्रवारी) नाशिक येथील पर्यटन भवनात पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक नंदकुमार राऊत यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केलेले हे सर्वजण आता पर्यटन संचालनालयाचे अधिकृत गाईड म्हणून कार्यरत राहतील. पर्यटकांच्या सोयीसाठी आणि विश्वासार्ह सेवेसाठी या अधिकृत गाईड्सची नावे महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.'ट्रेकॅम्प'च्या माध्यमातून दुर्गभ्रमंती, हेरिटेज वॉक आणि पर्यावरण संवर्धनाचे कार्य सुरू असतानाच आता संस्थेच्या सदस्यांना मिळालेल्या या शासकीय मान्यतेमुळे पर्यटकांना अधिक दर्जेदार व माहितीपूर्ण अनुभव मिळणार आहे. यासाठी ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी आणि सहसंस्थापक मेघा लाहोटी यांचे मार्गदर्शन लाभले. पर्यटन विभागाचे विजय जाधव, शिवाजी गायकवाड, अजीमुद्दिन शेख यांचेही सहकार्य लाभले.

# वाणीला चांगल्या विचारांची जोड मिळाल्यास प्रभावी वक्तृत्व निर्माण होते

## उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांचे प्रतिपादन; शारदा व ज्ञानेश्वर करंडक वाद स्पर्धेचे पारितोषिक वितरण; राज्यातील संघांचा प्रतिसाद

नगर – वाद स्पर्धेत देशातील ज्वलंत विषयांवर झेन झी युवा सकारात्मक व नकारात्मक या दोन्ही बाजूंनी व्यक्त होत आहेत. आशा स्पर्धेत सहभागी होणे महत्वाचे आहे कारण यामुळेच आत्मविश्वास, विचारांना व अभिव्यक्तीला प्रोत्साहन मिळते व त्यांची विचार करण्याची क्षमता वाढते. निसर्गाने दिलेल्या वाणीला जर प्रभावी विचारांची जोड मिळाल्यास समाज परिवर्तन करणारे प्रभावी वक्तृत्व निर्माण होते. आशा चांगल्या स्पर्धेचे आयोजन करून सारडा महाविद्यालय उत्कृष्ट काम करत आहे. हिंद सेवा मंडळाची प्रगतीही वाखाणण्याजोगी असून त्यांच्या संस्थांमधून देश घडवणारे विद्यार्थी घडत आहेत, असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी केले.


सारडा महाविद्यालयात झालेल्या राज्यस्तरीय शारदा व ज्ञानेश्वर करंडक वाद स्पर्धेतील विजेत्या संघांना करंडक व पारितोषिके देताना उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील.

पेमराज सारडा महाविद्याल आयोजित राज्यस्तरीय शारदा व ज्ञानेश्वर करंडक वाद स्पर्धेतील विजेत्या संघांना व विद्यार्थ्यांना सुधीर पाटील यांच्या हस्ते ज्ञानेश्वर व शारदा रौप्य करंडक व रोख पारितोषिके देण्यात आली. हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. अनंत फडणीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास मानद सचिव सुमतीलाल कोठारी, कार्याध्यक्ष अनंत देसाई, माजी सचिव संजय जोशी, माजी कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर, महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, प्रा.ज्योती कुलकर्णी, जगदीश झालानी, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित आदींसह प्राध्यापक, परिक्षक व सहभागी संघातील विद्यार्थी उपस्थित होते.

अ‍ॅड.अनंत फडणीस म्हणाले, शारदा व ज्ञानेश्वर वाद करंडक स्पर्धा संपूर्ण राज्यात नावाजलेली आहे. १९८१ साली मी या स्पर्धेत भाग घेऊन जिंकलो होतो. व्यक्तिमत्व खुलवणाऱ्या या स्पर्धेत पारितोषिक जिंकण्यापेक्षा सहभागी होणे महत्त्वाचे आहे. वक्तृत्व कला ही एआय ने सादर करता येत नाही तर ही कला स्वतःमध्ये विकसित करावी लागते.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, नव्या पिढीच्या विचारांना चालना देण्यासाठी त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी ही स्पर्धा उपयुक्त आहे. यासाठीच सारडा महाविद्यालयात दरवर्षी या स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन व नियोजन केल्याने या स्पर्धेचा प्रतिसाद वाढत आहे.

आनंत देसाई म्हणाले, या वाद स्पर्धेमध्ये अनेक दिग्गजांनी सहभाग नोंदवून यश मिळवले आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपले जीवन फुलावे व बहरावे यासाठी दरवर्षीय आशा स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे.

प्रारंभी प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी स्वागत केले. स्पर्धा संयोजक डॉ.राहुल पंडित यांनी प्रास्ताविक केले. प्रा.माणिक रासने यांनी आभार मानले. प्रा.अविनाश झरेकर व प्रा.प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास उपप्राचार्य मिलिंद देशपांडे व प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक प्रा.सुजित कुमावत, कल्याण लकडे आदींसह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

स्पर्धेचा सविस्तर निकाल असा :– शारदा करंडक वाद स्पर्धा निकाल सांघिक प्रथम अहमदनगर कॉलेज, द्वितीय माणिकचंद महाडिया लॉ कॉलेज संभाजीनगर, तृतीय न्यू लॉ कॉलेज अहिल्यानगर. वैयक्तिक प्रथम सुजित पानसंबळ न्यू आर्ट्स कॉलेज, द्वितीय प्राप्ती बुधवंत महाराष्ट्र लॉ कॉलेज व तृतीय जानवी संहान अहमदनगर कॉलेज. उत्तेजनार्थ आरुषी भावनानी, संपदा लांडगे व वैभव बंगाळे.

ज्ञानेश्वर करंडक प्रथम न्यू आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज अहिल्यानगर, द्वितीय वारे कॉलेज अहिल्यानगर व रामराव चव्हाण उच्च माध्यमिक विद्यालय अहिल्यानगर, वैयक्तिक प्रथम अल्फिया कुरेशी अहमदनगर कॉलेज, द्वितीय कांचन ननावरे वारे कॉलेज व तृतीय उर्वा सय्यद न्यू आर्ट्स कॉमर्स कॉलेज अहिल्यानगर. उत्तेजनार्थ आकांक्षा चतुर्वेदी, दर्शन चौधरी व देवकर ईश्वरी. विजेत्या संघना चांदीचे करंडक व रोख रक्कम देण्यात आले.


जय बजरंग प्राथमिक विद्यालयात घनकचरा व्यवस्थापनाविषयी जनजागृती करण्यात आली.

# जय बजरंग प्राथमिक विद्यालयामध्ये घनकचरा व्यवस्थापनाविषयी जनजागृती

नगर – स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत माहिती, शिक्षण, प्रसार व जनजागृती या घटकाच्या अनुषंगाने आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक विद्यालय, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे विद्यार्थ्यांसाठी घनकचरा व्यवस्थापन या विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून श्रीमती सुवर्णा वाघ यांनी आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व, कचऱ्याचे विविध प्रकार, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, स्वच्छतेच्या चांगल्या सवयी, '७ आर' संकल्पना तसेच कचऱ्याचा उगमापासून ते अंतिम व्यवस्थापनापर्यंतचा प्रवास याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे, कचऱ्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रण करणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबींवर विद्यार्थ्यांचे लक्ष वेधण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांना घनकचरा व्यवस्थापनाची संकल्पना समजून घेण्यास मदत झाली. तसेच स्वच्छता ही केवळ वैयक्तिक सवय नसून ती सामाजिक जबाबदारी आहे, याची जाणीव करून देण्यात आली. पर्यावरणाचे संरक्षण, प्रदूषणावर नियंत्रण आणि स्वच्छ परिसराची निर्मिती यांसाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग घेणे आवश्यक असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

या कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल मोरे यांनी केले, तर गणेश शिंदे सर यांनी आभार मानले.

# के.जी. महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांना 'रिसर्च एक्सलन्स अ‍ॅण्ड अकॅडमिक लीडरशिप अ‍ॅवॉर्ड'



नगर – के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांना संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान आणि शैक्षणिक नेतृत्वाबद्दल 'रिसर्च एक्सलन्स अ‍ॅण्ड अकॅडमिक लीडरशिप अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. काईट क्राफ्ट असोसिएशन व दिल्ली जीआयए यांच्या वतीने दिल्ली येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी विविध संशोधन लेखांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन या महत्त्वपूर्ण विषयांवर अभ्यासपूर्ण योगदान दिले आहे. त्या यूके सर्टिफिकेशन अ‍ॅण्ड इन्स्पेक्शन लिमिटेड कंपनीच्या लीड ऑडिटर म्हणूनही पर्यावरण क्षेत्रात कार्यरत आहेत. पर्यावरण व्यवस्थापन, पर्यावरणविषयक माणके आणि शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनातून त्या कार्य करीत आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव आणि पर्यावरणविषयक व्यावसायिक कार्य यांचा समन्वय साधत त्यांनी संशोधन क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

त्यांच्या संशोधन लेखांमध्ये 'ग्रीन इकॉनॉमी अ‍ॅण्ड सस्टेनेबल डेव्हलपमेंट इन इंडिया : चॅलेंजेस अ‍ॅण्ड ऑपॉर्च्युनिटीज', 'ग्रीन हायड्रोजन स्कोअर फॉर इंडियन मिशन', 'एन्व्हायर्नमेंटल हॅझर्ड मॅनेजमेंट' तसेच 'बिलीफ ऑफ इंडिजिनस पीपल टुवर्डस् एन्व्हायर्नमेंट अ‍ॅण्ड नॅचरल रिसोर्स मॅनेजमेंट' यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश आहे. सध्याच्या जागतिक तापमानवाढीच्या आणि पर्यावरणीय असमतोलाच्या पार्श्वभूमीवर हरित अर्थव्यवस्था, शाश्वत विकास, पर्यावरणीय धोके आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन या विषयांवरील त्यांचे संशोधन विशेष महत्त्वाचे आहे. संशोधन, शैक्षणिक नेतृत्व आणि पर्यावरण व्यवस्थापन या तिन्ही क्षेत्रांमध्ये त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

# राष्ट्रीय अधिवेशनात डॉ. सुचित तांबोळी यांना जीवन गौरव पुरस्कार

नगर – पौंडेचारी येथे झालेल्या वाढ विकास आणि वर्तन समस्या या बालरोग शाखेच्या राष्ट्रीय अधिवेशनात डॉ. सुचित तांबोळी यांना ओरेशन प्रमुख लेक्चर साठी बोलवले होते.



डॉ. सुचित तांबोळी यांना राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. नीलम मोहन तसेच राष्ट्रीय सेक्रेटरी डॉ. माहेश्वरी, जीडीपी चॅप्टरचे अध्यक्ष अमोला पटेल आणि सेक्रेटरी डॉ. अजय श्रीवास्तव यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. तांबोळी यांना लवकर हस्तक्षेप उपचारपद्धतीचा मुलांच्या वाढ विकासावरती होणारा परिणाम या विषयावरती बोलण्यासाठी आमंत्रित केले होते. आपल्या सखोल भाषणामध्ये डॉ.तांबोळी यांनी १९०० पासून ते २०२६ सालापर्यंत बौद्धिक विकास कार्यक्रमांमध्ये कसे बदल घडत गेले, कमी दिवसाच्या कमी वजनाच्या बाळांमध्ये कशाप्रकारे उपचार पद्धतीत बदल घडत गेले याविषयी माहिती दिली. त्यांच्या भाषणामध्ये त्यांनी आई ही उत्तम उपचार शिक्षिका मानून, वयानुसार कोणती खेळणी द्यायची, वातावरण कसे द्यायचे याबाबत केलेले संशोधन मांडले. जन्मल्यापासून दहा वर्षापर्यंत कोणती खेळणी द्यायची खेळण्यांच्या साह्याने कसे उपचार करायचे याबद्दलची माहिती बालरोग तज्ञांना सांगितली. जन्मतः अतिदक्षता विभागातील मुलांना तिथेच त्यांच्या आयांना प्रशिक्षण देऊन जर बौद्धिक विकास कार्यक्रम दिला तर पुढे येणाऱ्या अडचणी आणि बुद्धी विकास यातील अडथळे ४०% ने कमी होतात हे त्यांनी संशोधनाद्वारे सिद्ध करून दाखवले. मुलांची बुद्धी वाढवताना भावनिक विकासाचे महत्त्व आणि भावनिक लसीकरण त्यांनी समजावून सांगितले.

नगर सारख्या ठिकाणी महाराष्ट्रातील पहिले बाल विकास केंद्र सुरू करून मागील ३४ वर्ष जे संशोधन चिरंजीव क्लिनिक येथे केले ते बालरोग तज्ञांना सांगून त्याचा उपयोग प्रॅक्टिस मध्ये कसा करून घेता येईल याचे देशभरातील बालरोग तज्ञांना मार्गदर्शन केले.आईकडे बघून हसणे दोन महिने, चार महिन्याला मान धरणे, आठ महिन्याला बसणे आणि एक वर्षाला उभे राहणे आणि दादा मामा बोलणे या अत्यंत आवश्यक गोष्टी आईने पहिल्या वर्षात बघायला पाहिजेत असे त्यांनी सांगितले.

या अधिवेशनात डॉ. तांबोळी यांच्या भाषणाचे डॉ. सीतारामन, डॉ. शिवप्रकाशन अशा सीनियर डॉक्टरांनी कौतुक केले. नगर जिल्ह्यात हा सन्मान मिळवणारे ते एकमेव बालरोगतज्ञ आहेत.

# भिंगार अर्बन को.ऑप.बँकेच्या सभासदांना १५ टक्के डिव्हिडंड वाटप

### सभासदांच्या हितासाठी पारदर्शक निर्णय हाच भिंगार बँकेच्या यशाचा पाया : आ.अक्षय कर्डिले



भिंगार अर्बन बँकेच्या सभासदाना डिव्हिडंड वाटप आ.अक्षय कर्डिले यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ.एस.एस. दिपक, चेअरमन अनिलराव झोडगे, व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी शशीकांत महाजन व सभासद, संचालक उपस्थित होते.

नगर – भिंगार बँकेने नेहमीच व्यावसायिकांना, छोट्या – मोठ्या उद्योजकांना वेळोवेळी कर्ज वाटप करून आर्थिक उभारी दिली आहे. आज अनेक बँका कर्ज वाटप टाळतात; मात्र भिंगार बँकेने सभासदांच्या हिताला प्राधान्य देत विश्वासाने कर्जवाटप केले. सभासदांनीही योग्य वेळेत परतफेड केली, त्यामुळेच बँकेचे नाव जिल्ह्यात व राज्यात ठळकपणे टिकून आहे.बँकेने सभासदांशी आपले नाते घट्ट केले आहे. बँकेचे सर्व निर्णय पारदर्शक पद्धतीने चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालकांच्या संगनमताने घेतले गेले, हीच या यशाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन आ.अक्षय कर्डिले यांनी केले.

भिंगार अर्बन को. ऑप. बँक लि., भिंगार बँकेच्या सभासदांना सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षाचा डिव्हिड लाभांश १५% आ.अक्षय कर्डिले यांचे हस्ते सभासदांना वाटप करुन सुरुवात करण्यात आली. यावेळी चेअरमन अनिलराव झोडगे, व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी, संचालक राजेंद्र पतके, विष्णु फुलसौंदर, महेश झोडगे, माधव गोंधळे, रुपेश भंडारी, कैलास रासकर, कैलास दळवी, एकनाथराव जाधव व, नामदेवराव लंगोटे, तिलोतमाबाई करांडे, अनिता भुजबळ, मुख्य कार्यकारी अधिकारी शशीकांत महाजन व सभासद उपस्थित होते.

यावेळी साईदीप हॉस्पिटलचे डॉ.एस.एस दीपक म्हणाले की, भिंगार बँकेमुळे सभासदांना अनेक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. ठेवी ठेवताना किंवा कर्ज घेण्याच्या प्रक्रियेत कुठलीही अडचण वाटत नाही. बँकेने निर्माण केलेला विश्वास प्रशंसनीय आहे. व्यवसायासाठी अन्यत्र जाण्याची आवश्यकता राहत नाही, कारण बँकेच्या माध्यमातूनच अनेक योजना उपलब्ध आहेत. आमच्या सारख्या डॉक्टरांना पेशन्टचे रिपोर्ट पाहून निर्णय घ्यावा लागतो परंतु या ठिकाणी बँकेच्या रिपोर्ट वरून बँकेची परिस्थिती चांगली आहे असे कळते. यामुळेच परिसरातील छोटे उद्योग आज मोठ्या प्रमाणात उभे राहून प्रगती साधत आहेत, असे ते म्हणाले.

याप्रसंगी चेअरमन अनिल झोडगे यांनी ज्या सभासदांची बँकेत खाती आहेत त्याचा लाभांश त्यांचे खात्यामध्ये जमा करण्यात आला आहे. बँक पुरवित असलेल्या आधुनिक बँकिंग सुविधांचा सभासदांनी व खातेदारांनी बँकेशी व्यवहार करुन लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी उपाध्यक्ष किसनराव चौधरी यांनी ज्या सभासदांनी आपले खाते बँकेत उघडले नाही अशा सभासदांनी आपले खाते बँकेत उघडून घ्यावे म्हणजे डिव्हिडंड खात्यात वर्ग करणे सोयीचे होईल. त्याचप्रमाणे विविध शाखांमध्ये खाते असलेल्या खातेदारांनी आपला खाते नंबर व डिव्हिडंड खात्यात जमा करणेसाठीचा अर्ज आपल्या नजिकच्या शाखेत द्यावा असे आवाहन केले.

यावेळी संचालक विष्णू फुलसौंदर यांची बँक्स असो. व्हाईस चेअरमन पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा बँकेच्या वतीने आमदार अक्षय कर्डीले यांनी सत्कार केला

यावेळी प्रास्तविक मुख्यकार्यकारी अधिकारी शशिकांत महाजन यांनी केले व बँक राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी कार्यक्रमास बँकेचे सर्व संचालक मंडळ, खातेदार उपस्थित होते. नामदेव लंगोटे यांनी आभार मानले. तसेच यावेळी आ.कर्डिले, डॉ.दिपक यांचा बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सभासद राजेंद्र कापरे, बाळू कोष्टी, अशोक रासकर, बनकर, धाडगे, सौ. कल्याणी कापरे, मंदा मोरे, अलका पांढरे आदी उपस्थित होते



बी.पी.एच.ई. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँण्ड करिअर डेव्हलपमेंटमध्ये 'मॅनेजमेंट गेम्स २०२६' चा दीपप्रज्वलनाने शुभारंभ करताना आयएमएसचे सल्लागार डॉ.एम.बी.मेहता, प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, विभाग प्रमुख डॉ. हतीम कयूमी आदी.

# आय.एम.एस. संस्थेत 'मॅनेजमेंट गेम्स २०२६' उत्साहात

नगर – बी.पी.एच.ई. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँण्ड करिअर डेव्हलपमेंटमध्ये 'मॅनेजमेंट गेम्स २०२६' उत्साहात पार पडले. यंदा या गेम्सची संकल्पना 'वसुधैव कुटुंबकम् – संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे' अशी होती. एकम, संगम, मैत्री, सहयोग, युक्ती, सहभागिता, समरस्य, विश्व, दक्षता आणि चातुर्य अशा दहा संघात विद्यार्थ्यांची विभागणी करण्यात आली. रील मेकिंग, ब्रँड वॅगन, अ‍ॅड मॅड शो, मॉक स्टॉक, एच.आर. टीम बिल्डिंग, बेस्ट मॅनेजर व स्पॉन्सरशिप अशा विविध स्पर्धांमध्ये सर्व संघांनी हिरीरीने सहभाग घेतला.

यावेळी आयएमएसचे सल्लागार डॉ.एम.बी. मेहता, प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, विभाग प्रमुख डॉ. हतीम कयूमी व प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. एम. बी. मेहता यांनी आयोजन समितीने निवडलेल्या समर्पक संकल्पनेबद्दल कौतुक केले व विद्यार्थ्यांना खेळांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित केले.

डॉ. प्रणोती तेलोरे यांनी खेळांचे महत्त्व विशद करून खेळाची भावना जपण्याचे आवाहन केले.

डॉ. विक्रम बार्नबस यांनी हार–जीत हा खेळाचा अविभाज्य भाग असून सहभाग अधिक महत्त्वाचा असल्याचे सांगितले. डॉ. हातिम कयूमी यांनी सहभागींना शुभेच्छा दिल्या.

विविध स्पर्धातील विजेते व उपविजेता संघ पुढीलप्रमाणे – रिल मेकिंग – युक्ती व मैत्री, स्पॉन्सरशिप – मैत्री व दक्षता, ब्रँड वॅगन– मैत्री व युक्ती, अ‍ॅड मॅड शो – संगम व युक्ती, मॉक स्टॉक – एकता व विश्व, एच.आर. टीम बिल्डिंग– दक्षता व विश्व. बेस्ट मॅनेजर किताब रितू चुग (एमबीए–१) हिला मिळाला. स्पर्धेत मैत्री संघाने सर्वसाधारण विजेतेपद तर युक्ती संघाने उपविजेतेपद पटकावले. विजेत्या व उपविजेत्या संघांना रोख पारितोषिके, चषक व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

या उपक्रमाचे नियोजन एमबीए –२ च्या ऑर्गनायझिंग कमिटीने (एकता) केले. त्यांच्या कल्पकतेने आणि परिश्रमाने कार्यक्रम उत्कृष्टरित्या पार पडला. डॉ. मनोज कुलकर्णी, डॉ. हर्षवर्धन भावसार यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.


## अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

**स्टोअर विभाग**
**– बाजार भावाबाबत कोटेशन**
**दरपत्रक सुचना –**

स्टोअर विभाग जाक्र– २१८

दि. १२/ १० /२०२६ अन्वये अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता हात धण्याचा साबण प्रत्येकी कमीत कमी वजन १२५ ग्रॅम नामांकित कंपनी ७००० नग खरेदीकामी दरपत्रके मागविणेसाठी amc.gov.in या मनपा वेबसाईटवर व नोटीस बोर्डवर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे तरी संबंधितांनी नोंद घ्यावी

**उपायुक्त (कर)**
अहिल्यानगर महानगरपालिका


# महाराष्ट्र पब्लिक स्कूलमध्ये रोबोटिक्स शिक्षणाचा नवा अध्याय

### इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत रोबोटिक्सचे धडे; कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या शिक्षणावर भर





नगर – बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सक्षम बनविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सावेडी येथे चालू शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक्स शिक्षणाचा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. प्राचार्य अंकुश दराडे आणि मुख्याध्यापिका सौ. हेमा कोंगे यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधनवृत्ती विकसित करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि आधुनिक तांत्रिक कौशल्यांचे प्रात्यक्षिकावर आधारित शिक्षण दिले जात आहे. केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता प्रत्यक्ष कृतीतून शिकण्यावर भर देण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाविषयी उत्सुकता वाढत आहे. विद्यार्थ्यांनी विविध नाविन्यपूर्ण रोबोटिक्स वर्किंग मॉडेल्स तयार करून आपल्या कल्पकतेची आणि तांत्रिक कौशल्याची प्रचिती दिली. तसेच रोबोटिक्स स्पर्धांमध्ये इयत्ता पाहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत त्यांनी तयार केलेल्या रोबोटीक्स मॉडेलचे सादरीकरण केले. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे आणि ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमाला पालकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला तंत्रज्ञानाची जोड

पारंपरिक शिक्षणपद्धतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांना भविष्यातील तंत्रज्ञानाधारित जगासाठी तयार करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहे. रोबोटिक्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये समस्या सोडविण्याची क्षमता, व नाविन्यपूर्ण कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याची वृत्ती विकसित होण्यास मदत होत आहे. लहान वयातच कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्ससारख्या आधुनिक विषयांचा परिचय करून देणे ही काळाची गरज असून, महाराष्ट्र पब्लिक स्कूलने या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

महाराष्ट्र तांत्रिक शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती दराडे यांनी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, पारंपरिक शिक्षणासोबत आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळणे आवश्यक आहे. रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि सर्जनशीलतेला चालना मिळते. विद्यार्थ्यांना लहान वयातच अशा संधी उपलब्ध करून देणे हे त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाचे आहे.

### शिक्षक व प्रशिक्षकांचे विशेष योगदान

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी रोबोटिक्स प्रशिक्षक विकास कोतकर, सौ. मनीषा कोतकर, शाळेचे समन्वयक प्रणव दराडे आणि सौ. शुभांगी काटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

शाळेच्या या तंत्रज्ञानाभिमुख उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना नव्या संधींची दारे खुली होत असून, आधुनिक शिक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्र पब्लिक स्कूल, सावेडी नवा आदर्श निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत, **सौ. सोनम संग्राम खिलारी** (रा. प्लॉट नं. ४८, ४९, ५०, पाईपलाईन रोड, एकवीरा चौक, ज्ञानेश्वर नगर, सावेडी, अहिल्यानगर) यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकत त्यांनी आमचे अशीलास खरेदी देण्याचे ठरविले असून त्याबाबत त्यांनी विसार देखील स्वीकारलेला आहे. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असून त्यामध्ये दुसऱ्या कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही मालकी हक्क, हितसंबंध अगर कब्जा नाही, अशी त्यांनी आमचे अशीलास खात्री दिली असून भरवसा दिला आहे. तथापि सदर मिळकती मध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारसा हक्क, वहिवाट, इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही मालकीहक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ **(सात)** दिवसात कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवावी अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कळावे.

**मिळकतीचे वर्णन (परिशिष्ट)**

जिल्हा: अहिल्यानगर, सब–डिस्ट्रिक्ट व तालुका: नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे शहरनगर** येथील **टि.पी. स्कीम नं. ३** मधील फायनल प्लॉट नं. ५१ (एकूण क्षेत्रफळ ११५८४.० या फायनल प्लॉट मधील सब प्लॉट नं. ९ यावर बांधण्यात आलेल्या **''यशश्री अपार्टमेंट''** या इमारतीमधील खालील दोन्ही दुकाने:

**१) दुकान नं. २ (तळ मजला):** बांधकाम क्षेत्रफळ: २०.४४ चौ. मी.
**चतुःसीमा:** पूर्वेस– फ्लॅट नं. १, दक्षिणेस– फ्लॅट नं. ३, पश्चिमेस– प्लॉट नं. पैकी उर्वरित क्षेत्र, उत्तरेस– दुकान नं. १.

**२) दुकान नं. ३ (तळ मजला):** बांधकाम क्षेत्रफळ: १५.१७ चौ. मी.
**चतुःसीमा:** पूर्वेस, दक्षिणेस आणि पश्चिमेस– प्लॉट नं. पैकी उर्वरित क्षेत्र, उत्तरेस– दुकान नं. २.

(सदर दोन्ही दुकान मिळकती त्यातील चालू व्यवसाय ''आनंद मेडिकल'' नावलौकीक (गुडविल,फर्निचर लाईट पंखे फ्रिज व सामाईक रस्त्याच्या हक्कांसह विक्री करावयाच्या आहेत.)

दिनांक: १३/१०/२०२६, ठिकाण: अहिल्यानगर

**अ‍ॅड. सिद्धेश प्रमोद मेहेर**
गोवर्धन अपार्टमेंट, स्टेशन रोड अहिल्यानगर मो–९३७३३६३५३६


# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

### सन २०२४–२५ व २०२५–२६ या दोन वर्षांसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू

नगर – महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, संघटक तसेच दिव्यांग खेळाडू यांना प्रदान करण्यात येणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी सन २०२४–२५ व सन २०२५–२६ या दोन वर्षांकरिता ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. पात्र खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक व संबंधितांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत राज्यातील उत्कृष्ट क्रीडापटू आणि क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी विशेष योगदान देणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ क्रीडा महर्षींकरिता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शक व संघटकांसाठी उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक/जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक), तसेच शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम) आणि शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) अशा विविध प्रकारांमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात येतात. शासन निर्णय २९ डिसेंबर २०२३ व २५ जानेवारी २०२४ अन्वये शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांची सुधारित नियमावली निश्चित करण्यात आली आहे. या नियमावलीनुसार सन २०२४–२५ व सन २०२५–२६ या दोन्ही वर्षांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१५ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार : इच्छुक व पात्र क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रमातील व्यक्ती आणि दिव्यांग खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या अधिकृत https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर १२ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अर्ज सादर करावेत. अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजून ५९ मिनिटांपर्यंत असून, अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारण्यात येणार आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पात्र खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, संघटक, साहसी उपक्रमातील व्यक्ती व दिव्यांग खेळाडूंनी शासनाच्या नियमानुसार आवश्यक माहिती व कागदपत्रांसह विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करावेत. जिल्ह्यातील अधिकाधिक पात्र क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# 'आंतरशालेय बास्केटबॉल स्पर्धेमध्ये' केडगाव स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमीला विजेतेपद



नगर – १४ वर्षांखालील आंतरशालेय बास्केटबॉल क्रीडा स्पर्धेत केडगाव स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमीच्या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावत यश संपादन केले. सांघिक समन्वय, अफाट चपळाई, अचूक खेळ आणि विजयासाठीची जिद्दीच्या बळावर खेळाडूंनी स्पर्धेत प्रभावी कामगिरी केली.

केडगाव स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमीच्या या यशस्वी संघातील खेळाडू पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, केडगाव येथे शिक्षण घेत आहेत. शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करण्याची क्षमता या खेळाडूंनी सिद्ध केली आहे. स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी दाखवलेली शिस्त, प्रतिस्पर्धी संघाविरुद्ध केलेली प्रभावी रणनीती आणि एकजुटीने केलेला खेळ यामुळे संघाला प्रथम क्रमांक मिळवण्यात यश आले. अंतिम सामन्यातही खेळाडूंनी आपली गुणवत्ता सिद्ध करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

यशस्वी संघाला प्रशिक्षक छबुराव कोतकर आणि स्वाती बारहाते यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या कौशल्यविकासासाठी नियमित सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण, सांघिक खेळाचे महत्त्व आणि सामन्यातील योग्य रणनीती यावर त्यांनी विशेष भर दिला. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी हे यश संपादन केले.

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही आपली गुणवत्ता सिद्ध करावी, या उद्देशाने अ‍ॅकॅडमीच्या माध्यमातून खेळाडूंना प्रोत्साहन दिले जात आहे. बास्केटबॉलसारख्या सांघिक खेळातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, संघभावना आणि संघर्ष करण्याची वृत्ती विकसित होत असल्याचे या यशातून स्पष्ट झाले आहे.

या यशाबद्दल अ‍ॅकॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर, ऊर्जा गुरुकुलच्या संचालिका कल्याणी फिरोदिया, संदीप वाकचौरे, रोहिणी ठुबे, अ‍ॅकॅडमीच्या खजिनदार रोहिणी कोतकर तसेच ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसचे संचालक प्रसाद जमदाडे यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.


## नगर अर्बन बँक स्टाफ को-ऑप. सोसायटी लिमिटेड, अहमदनगर

रजि. नं. : ए. एन. आर. / बँक / ११० दि. २५/०१/१९६७

**विशेष सर्व साधारण सभा नोटीस (फक्त सभासदांसाठी)**

नगर अर्बन बँक स्टाफ को-ऑप. सोसायटी लिमिटेड, अहमदनगर या संस्थेची सन २०२५-२०२६ या अर्थिक वर्षातील सर्वसाधारण सभा **शनिवार दि. २४/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. नगर अर्बन को-ऑप. बँक, प्रधान कार्यालय इमारत, अहिल्यानगर** येथे सोसायटीचे मा. प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

**टीप:** विशेष सर्व साधारण सभेची सविस्तर नोटीस नगर अर्बन को-ऑप. बँक, प्रधान कार्यालय, अहिल्यानगर येथे पहावयास मिळेल.

**मा.प्रशासक यांच्या मान्यतेने**
**सचिव**
**नगर अर्बन बँक स्टाफ को-ऑप. सोसायटी लिमिटेड, अहमदनगर**

दिनांक : ९/१०/२०२६
ठिकाण : अहिल्यानगर



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,– खाली नमुद केलेली मिळकत ही आमचे अशिलांचे प्रत्येकी १/६ अविभक्त हिस्स्याचे मालकीची असून सदर मिळकतीवर आमचे अशिलांनी मेघनंद लॉन्स व रेस्टॉरंट चालविण्यासाठी भागिदार म्हणून राहुल रामेश्वर मनियार यांना दि.२९/०३/२००५ रोजी कुलमुखत्यारपत्र देवून मिळकतीची देखभाल करण्याकरीता तसेच ऐस्टॉरंट व लॉन्सचे दैनंदिन काम पाहण्याकरीता अधिकार दिलेले होते मात्र त्यांची वर्तणुक आमचे अशिलांचे हक्काचे विरोधात सुरु झाल्याने व त्यांनी आमचे अशिलांचे विरुध्द अहमदनगर येथील दिवाणी न्यायालयात स्पे मु नंबर १५९/२०२६ चा दाखल करुन खोट्या तक्रारी उपस्थित केल्यानंतर आमचे अशिलाने त्यांचे मुखत्यारपत्र रद्द केलेली असून वैयक्तीकरित्या त्यांना कळविण्यात आलेले आहे. तथापी रद्द केलेल्या मुखत्यारपत्राचा गैरवापर करुन त्यांनी कोणाही बरोबर कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये व त्रयस्त इसमांची कुठलीही फसवणुक होवू नये म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करुन सदर मुखत्यारपत्र रद्द केल्याबाबतची माहिती सदर जाहीर नोटीस सर्वांना कळवित आहोत. यापुढे त्यांचेबरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, डिड, करार, मदार, साठेखत, अगर अन्य कोणताही व्यवहार आमचे अशिलाकरीता करु नये मिळकतीवर त्रयस्तांचे हक्क हितसंबंध व बोजे निर्माण करु नये, याउपरही कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार आमचे अशिलांचे परस्पर संमतीविना केल्यास तो आमचे अशिलांवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही कोणतीही फसवणुक होवू नये म्हणून जाणीवपुर्वक सदरची नोटीस प्रसिध्द केली आहे.

**परीशिष्ट**

**१) मिळकतीचे वर्णन :–** जिल्हा तुकडी अहिल्यानगर पोट तुकडी तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील बिनशेती मिळकतीचे वर्णन खाल्लीलप्रमाणे–

| स नं. | फायनल प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| २६७ | १+२+३+२२+२३+२४+२५ | ३३४०.०० |

**यांसी चतुःसिमा –**
पुर्व– नगर मनमाड रोड, दक्षिण– प्लॉट नं.४ आणि प्लॉट नं.२१
पश्चिम– ९ मी रुंद अंतर्गत रोड उत्तर– स नं. २२४

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णनाची प्लॉट मिळकत यावरील असलेल्या बांधकामासह, तदंगभत वस्तुसह वागणुकीचे वहिवाटीचे हक्कासह काहीएक राखुन न ठेवता असे.

कळावे, ही नोटीस दिली असे.
ता. १३/१०/२०२६, अहिल्यानगर

**अ‍ॅड. स्वप्निल सतिष बिहाणी**
५,रामकमल बंगला, विराज इंस्टेट तारकपुर, बस स्टॅण्ड, अहमदनगर.


# निमगाव वाघात १८ ऑक्टोबर रोजी 'नवदुर्गा सन्मान सोहळा'

### कर्तृत्ववान महिलांचा होणार गौरव

नगर – नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने १८ ऑक्टोबर रोजी निमगाव वाघा (ता. नगर) येथे 'नवदुर्गा सन्मान सोहळ्या'चे आयोजन करण्यात आले आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांना यावेळी 'नवदुर्गा पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच महिला शक्तीचा जागर घडविणाऱ्या स्वरचित काव्य संमेलनाचेही आयोजन करण्यात आले आहे. पाहुण्यांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा व काव्य संमेलन पार पडणार आहे. आपल्या लेखणीतून महिला शक्ती, सामाजिक जाणीव, संस्कृती, निसर्ग आणि समकालीन विषयांना अभिव्यक्त करणाऱ्या कवी–कवयित्रींना या संमेलनात सहभागी होता येणार आहे. काव्याच्या माध्यमातून महिलांच्या कर्तृत्वाचा आणि सामर्थ्याचा जागर करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे.

'नवदुर्गा सन्मान सोहळ्या'साठी विविध क्षेत्रातील पात्र आणि कर्तृत्ववान महिलांनी आपले प्रस्ताव आयोजकांकडे पाठवावेत, असे आवाहन संमेलनाचे मुख्य संयोजक तथा ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे यांनी केले आहे.

या उपक्रमाबाबत अधिक माहितीसाठी नाना डोंगरे : ९२२६७३५३४६ / ८६०५७७५२६१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली शेत मिळकत ही विद्यमान मालक **शोभा देवराम पवार रा. रुम नंबर १८११, पवार निवास, एच एन रोड, अंबीविली पुर्व, पंचशिळनगर, मोहने, ठाणे–४२११०२ व किशोर धर्माजी घोडके रा. प्लॉट नंबर ३२, दत्त मंदिराजवळ, गांवठाण, केडगांव, अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाशी व्यवहाराची बोलणी केली असून, विसार म्हणून रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदीखत करुन देण्याचे ठरवले आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात (७) दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :–**

डि।। अहिल्यानगर सब डि।। व ता. नगर पैकी जिल्हापरिषद हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे सोनेवाडी (चास), ता. नगर येथील शेत जमिनीचा गट नं. ५७/१ याचे एकुण क्षेत्रफळ १ हे. ८३ आर. + पो. ख. 0हे. ०१ आर. असे एकूण क्षेत्र १हे. ८४आर. याचा आकार ४रु.०९पै. यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचे दक्षिण बाजूकडील संपूर्ण क्षेत्र 0हे. २४.५0आर. याचा आकार 0 रु. ५४ पै. यापैकी क्षेत्र 0 हे. ११ आर. हे क्षेत्र.**

**यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे :–**
पुर्वेस – बाहयवळण रस्ता, दक्षिणेस – गट नं. ५७/१ पैकी उर्वरित क्षेत्र,
पश्चिमेस – गट नं. ५१ व ५८,
उत्तरेस – गट नं. ५७/१ पैकी राजु धर्माजी घोडके, निर्मला सुरेश मिसाळ यांचे क्षेत्र

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर, दिनांक – १३/१०/२०२६

**अ‍ॅड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**अ‍ॅड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

# गरमागरम मूग डाळ टिक्की

झटपट रेसिपी

दोस्तांनो, शिक्षण किंवा नोकरीनिमित्ताने बाहेरगावी रहाताना घरच्या चवीची आठवण येत असते.

रोजच्या धावपळीत झटपट होणारे तेच ते पदार्थ खावे लागतात. मात्र एखाद्या दिवशी निवांत वेळ असल्यावर तुमच्यातला शेफ जागा होतो. मग एखादी वेगळी रेसिपी ट्राय करता येते. अर्थात ही रेसिपी पौष्टिकही असायला हवी. म्हणूनच प्रथिनयुक्त डाळीपासून टिक्की बनवता येईल. यासाठी मूग डाळ वापरता येईल. चला तर मग मूग डाळीची टिक्की बनवू या.

**सामग्री:** एक वाटी मूग डाळ, आल्याचा छोटा तुकडा, दोन हिरव्या मिरच्या, चिरलेली/कोथिंबिर, एक चिरलेला कांदा आणि सिमला मिरची, प्रत्येकी एक चमचा जिरेपूड आणि धनेपूड, एक चमचा कॉर्नफ्लोर, अर्धा चमचा आमचूर, चाट मसाला, ५० ग्रॅम पनीर, मीठ आणि तेल.

**कृती:** एका भांड्यात पाणी गरम करायला ठेवा. त्यात मूग डाळ घालून उकळून घ्या. डाळीतलं पाणी काढून टाका. आता ही डाळ थंड पाण्याने धुवून बाजूला ठेवा. डाळ थंड झाल्यावर मिक्सरच्या भांड्यात डाळ, आलं, हिरवी मिरची आणि कोथिंबिर घालून वाटून घ्या. हे वाटण एका भांड्यात काढा. आता यात चिरलेला कांदा, सिमला मिरची, जिरेपूड, कॉर्नफ्लोर, आमचूर, चाट मसाला, कुस्करलेलं पनीर आणि मीठ घाला. सर्व घटक नीट मिसळून घ्या. हाताला थोडं तेल लावा. मूग डाळीचं मिश्रण घ्या. त्याला टिक्कीप्रमाणे गोल आकार द्या. अशाप्रकारे सर्व टिक्की बनवून घ्या. गॅसवर तवा ठेवा. त्यावर तेल घाला. गरम झाल्यावर तव्यावर टिक्की ठेवा. दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्या. ही टिक्की सॉस किंवा चटणीसोबत खाता येईल.






## शेर की जुबानी

एक परवाह ही बताती है कि
ख्याल कितना है,
वरना कोई तराजू नहीं होता,
रिश्तों में।

जिंदगी गुजर जाए, पर
दोस्ती कम ना हो,
याद हमें रखना चाहे
पास हम ना हो।

काश दिल की आवाज में
इतना असर हो जाए,
हम याद करें और उसको
खबर हो जाए।

# अंगणातून जागतिक ब्रँडपर्यंत...

जयपूरपासून सुमारे २५० किलोमीटर अंतरावर राजस्थानमधील सरदारशहर हे एक छोटेसे शहर आहे. रंगीबेरंगी फ्रेस्को चित्रकला आणि नक्षीदार लाकडी कामाने सजलेल्या भव्य हवेल्यांसाठी हे शहर प्रसिद्ध आहे. आजही येथील अनोख्या शिसमच्या लाकडासाठी त्याची ओळख कायम आहे. याच शहरातील एका जुन्या हवेलीसारख्या घराच्या अंगणात काही कारागीर दिवसभर शिसमचे लाकूड कोरत असत. त्यांच्या कामाकडे एक सडपातळ मुलगा तल्लीन होऊन पाहत असे. काही वर्षांनंतर हाच मुलगा मोठ्या शहरात गेला. चांगल्या महाविद्यालयात प्रवेश घेतला. पदवी मिळवली आणि नोकरीच्या शोधात धडपड सुरू केली; मात्र त्याच्या मनात आपल्या घराच्या अंगणातील कारागिरांचे ते काम आणि लाकडाच्या घासण्याचा आवाज कायम घुमत होता. एक दिवस त्याच्या मनात विचार आला, जर जगातील इतर अनेक गोष्टी ऑनलाइन विकल्या जाऊ शकतात, तर कारागिरांनी तयार केलेले फर्निचर ऑनलाइन का विकता येऊ नये? काही मित्रांनी त्याची कल्पना ऐकून त्याची खिल्ली उडवली. 'फर्निचर ऑनलाइन कोण खरेदी करणार?' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला; मात्र त्याने त्याकडे दुर्लक्ष केले आणि स्वतःची वेबसाइट तयार केली.

सुरुवातीला ऑर्डरच मिळत नव्हत्या, तर कधी ग्राहकांचा विश्वास नसल्यामुळे उत्पादने परत येत होती. तांत्रिक अडचणीही होत्या. कुटुंबातील सदस्यांकडूनही या निर्णयावर प्रश्न उपस्थित केले जात होते; मात्र त्याने प्रत्येक अडचणीतून धडा घेत पुढे जाणे सुरूच ठेवले. हळूहळू त्याच्या मेहनतीला यश मिळाले. त्याच्या उपक्रमामुळे पारंपरिक कारागिरांना नवी ओळख मिळाली आणि छोट्या शहरातून सुरू झालेला व्यवसाय जागतिक ब्रँडमध्ये रूपांतरित झाला. आज त्या तरुणाला 'इन्सराफ डॉट कॉम'चे संस्थापक रघुनंदन सराफ म्हणून ओळखले जाते. रघुनंदन यांची कहाणी तरुणांसाठी एक महत्त्वाचा संदेश देते, संसाधने मर्यादित असली तरी मोठी स्वप्ने पाहता येतात आणि योग्य प्रयत्नांच्या जोरावर ती प्रत्यक्षातही आणता येतात.

रघुनंदन सराफ यांनी दिल्लीतील 'श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्स'मधून बी.कॉम. केले आणि २००९मध्ये एमबीए पूर्ण केले. छोट्या शहरातून व्यवसायाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार करणे सोपे नव्हते. त्यामुळे रघुनंदन यांनी व्यवसायात तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाइन विक्री सुरू करण्याची कल्पना वडिलांसमोर मांडली; मात्र वडिलांनी त्यास नकार दिला.

रघुनंदन यांच्या मनात व्यवसायात काहीतरी नवे करण्याची तीव्र इच्छा होती. त्यासाठी त्यांनी मित्रांकडून ५० हजार रुपये उधार घेतले आणि २०१४मध्ये कारखान्याच्या एका कोपऱ्यात छोटेखानी कार्यालय सुरू करून ऑनलाइन फर्निचर विक्रीचा व्यवसाय सुरू केला. त्यासाठी त्यांनी वेबसाइट तयार केली. पूर्वी कारखान्याच्या एका कोपऱ्यात असलेले ते छोटे कार्यालय आता मोठ्या आणि आधुनिक कार्यालयात बदलले आहे. सुरुवातीला या उपक्रमात केवळ तीनजण काम करत होते. आज कंपनीत सुमारे एक हजार कर्मचारी कार्यरत आहेत. विशेष म्हणजे, त्यांच्या कंपनीतील शेकडो कर्मचारी एलजीबीटी समुदायातील आहेत.



अचिव्हर

सराफ यांचा व्यवसायाचा प्रवास आव्हानांनी भरलेला होता. सरदारशहरसारख्या छोट्या शहरात लॉजिस्टिक्ससारख्या मूलभूत सुविधाही मर्यादित होत्या. त्यामुळे त्यांनी विविध लॉजिस्टिक्स कंपन्यांशी चर्चा केली, त्यांना आपल्या व्यवसायाबद्दल विश्वास दिला आणि हळूहळू सरदारशहरमधून काम करण्यासाठी तयार केले. ऑनलाइन ऑर्डर स्वीकारणे, विक्री व्यवस्थापित करणे आणि मोठ्या आकाराचे फर्निचर सुरक्षितपणे ग्राहकांपर्यंत पोहोचवणे हेही मोठे आव्हान होते. त्यासाठी त्यांनी सक्षम आणि विश्वासार्ह टीम उभी केली. पारंपरिक कौशल्याला तंत्रज्ञानाची जोड दिल्यास स्थानिक व्यवसायालाही जागतिक बाजारपेठ मिळू शकते, हे रघुनंदन सराफ यांच्या प्रवासातून अधोरेखित होते.

## ॲप वर्ल्ड



### घरबसल्या भरा व्हॉट्सॲपवर बिले

सध्या बिले भरण्यासाठी कोणत्याही कार्यालयात जाण्याची गरज नाही. आता आपण घरबसल्या ॲपच्या माध्यमातून बिले भरू शकतो. अनेकजण वीज, पाणी, गॅस याची बिले भरण्यासाठी वेगवेगळ्या ॲप्सचा वापर करतात; पण आता ही सगळी बिले एकाच ठिकाणी भरता येणार आहेत. व्हॉट्सॲपने भारतात एक नवीन 'बिल पेमेंट्स' फीचर सुरू केले आहे. या फीचरमुळे वापरकर्त्यांना विविध महत्त्वाची बिले थेट व्हॉट्सॲपद्वारे भरता येतील.

आतापर्यंत व्हॉट्सॲपचा वापर प्रामुख्याने चॅटिंग, फोटो आणि व्हिडीओ शेअर करणे आणि कॉलिंगसाठी केला जात होता; पण आता कंपनी ॲपच्या पेमेंट फीचर्सचा विस्तार करत आहे. नवीन 'बिल पेमेंट्स' फीचरमुळे, वापरकर्ते एकाच ॲपमधून आपली दैनंदिन बिले व्यवस्थापित करू शकतील. व्हॉट्सॲपच्या या नवीन फीचरमुळे वापरकर्त्यांना वीज, पाणी, पाईप गॅस, फास्टॅग, विमा, क्रेडिट कार्ड बिले आणि कर्ज परतफेड यासह विविध बिले भरता येतात. हे फीचर 'भारत कनेक्ट नेटवर्क'शी जोडलेले आहे. त्यामुळे वापरकर्त्यांना विविध बिलर्समधून निवड करण्याची मुभा मिळते; मात्र तुम्ही एखाद्या विशिष्ट कंपनीचे किंवा विभागाचे बिल तेव्हाच भरू शकता, जेव्हा ते या नेटवर्कवर उपलब्ध असेल.

हे फीचर वापरणे अगदी सोपे आहे. आधी, तुम्हाला तुमच्या फोनवर व्हॉट्सॲप उघडावे लागेल. त्यानंतर, व्हॉट्सॲपच्या होम स्क्रीनवरील '<' आयकॉनवर टॅप करा. तुम्हाला बिल पेमेंट्सचा पर्याय दिसेल. त्यावर टॅप केल्यानंतर, तुम्हाला जे बिल भरायचे आहे, ती श्रेणी निवडावी लागेल. समजा तुम्हाला विजेचे बिल भरायचे आहे, तर तुम्हाला वीज हा पर्याय निवडावा लागेल. त्यानंतर, तुमचा वीज विभाग किंवा सेवा प्रदाता निवडा. तुम्हाला तुमचा ग्राहक क्रमांक किंवा खाते क्रमांक टाकावा लागेल. माहिती टाकल्यानंतर, तुमचे बिल सिस्टीममध्ये उपलब्ध असेल, तर बिलाची रक्कम स्क्रीनवर दिसेल. त्यानंतर तुम्हाला बिलाची रक्कम आणि इतर माहिती तपासावी लागेल. एकदा सर्वकाही बरोबर असेल, की तुम्ही पेमेंट करू शकता.

जे लोक दर महिन्याला अनेक बिले भरतात, त्यांच्यासाठी हे फिचर फायदेशीर ठरेल. आता वीज, पाणी किंवा गॅस बिलांसाठी वेगवेगळे ॲप्स उघडण्याची गरज कमी होईल. याव्यतिरिक्त, पूर्वी वापरलेले बिलर्स व्हॉट्सॲपवर पुन्हा सहजपणे ॲक्सेस करता येतात, यामुळे पुढच्या वेळी बिल भरणे आणखी सोपे होते. हे फिचर अजूनही सर्वांच्या ॲपवर सुरू झालेले नाही. काही दिवसात ते ऑप्शन सर्वांसाठी दिसणार आहे.

# ...अन्यथा लवकर म्हातारे व्हाल



फिटनेस फंडा

दोस्तांनो, व्यायामामुळे तुम्ही तंदुरुस्त होता. वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. सकाळी छान ताजंतवानं वाटतं. हे जरी खरं असलं तरी काही चुकांमुळे तुम्ही खूप लवकर म्हातारे दिसू लागता. व्यायाम करताना कोणत्या चुका होतात? जाणून घेऊ.

* व्यायाम करताना शारीरिक स्थितीचा विचार करा. जीममध्ये व्यायाम करताना चुकीच्या पद्धतीने उभं राहिल्याने, वाकल्याने तुम्हाला त्रास होऊ शकतो. यामुळे पाठीच्या कण्याला बाक येतो. मग तुम्ही वाकून चालू लागता. हे टाळण्यासाठी व्यायाम करताना शरीराच्या स्थितीकडे लक्ष द्या. चुकीच्या शारीरिक स्थितीमुळे तुम्ही म्हातारे दिसू लागता.

* कार्डिओ हा खूप चांगला व्यायामप्रकार असला तरी त्याच्या अतिरेकाने शरीराचं नुकसान होऊ शकतं. विशिष्ट वयानंतर हाडं आणि स्नायूंना पुरेसा व्यायाम मिळाला नाही तर त्यांच्या कार्य मंदावतं. तसंच १८ ते ५० या वयोगटातल्या व्यक्तींनी वेट लिफ्टिंग आणि स्ट्रेंथ ट्रेनिंग करावं, असं एक संशोधन सांगतं. स्ट्रेंथ ट्रेनिंगमुळे स्नायूंना बळकटी मिळते. शिवाय कॅलरीही खर्च होतात.

* 'हाय इंटेसिटी इंटरवल ट्रेनिंग' गरजेचं आहे. या व्यायामामुळे वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. शारीरिक क्षमताही वाढते. या सगळ्यामुळे आपण बराच काळ तरुण रहातो.

* शरीर ताणण्याच्या व्यायामाकडे दुर्लक्ष करू नये. व्यायामाआधी आणि नंतर शरीर ताणायला हवं. शरीर ताणण्याचे व्यायाम केले नाहीत तर स्नायू आणि त्यातल्या टिश्यूंवर अकारण ताण येतो. तसंच या व्यायामामुळे शरीर लवचिक होतं आणि व्यायाम करताना त्रास होत नाही.

* सतत जीममध्ये व्यायाम करत राहिल्याने आपण तंदुरुस्त राहू हा समज चुकीचा आहे. व्यायामाप्रमाणेच शरीराला विश्रांतीचीही गरज असते. स्नायूंची झीज भरून काढण्यासाठी शरीराला वेळ देणं गरजेचं आहे.

# ...तरी 'पीएच.डी'ची संधी



उच्च शिक्षण

आर्थिक अडचणींमुळे गुणवंत विद्यार्थ्यांचे संशोधन थांबू नये, यासाठी झारखंडमधील नामांकित बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (बीआयटी) मेसरा, रांची येथे महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. 'जेआरएफ' मिळालेले नसतानाही 'पीएच.डी.' करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे दरमहा २५ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. ही आर्थिक मदत कमाल तीन वर्षांपर्यंत मिळणार आहे. 'यूजीसी-नेट जेआरएफ' पात्रता नसलेल्या विद्यार्थ्यांनाही 'बीआयटी' मेसरामध्ये पीएच.डी प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहे. अशा विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे घेण्यात येणारी स्वतंत्र प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करावी लागेल. प्रवेश निश्चित झाल्यानंतर पात्र विद्यार्थ्यांना संस्थेच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणार आहे. यामुळे 'जेआरएफ' मिळवण्यात अपयश आलेल्या विद्यार्थ्यांसाठी संशोधन क्षेत्रात पुढे जाण्याचा पर्याय उपलब्ध झाला आहे. तीन वर्षांपर्यंत मिळणारी दरमहा २५ हजारांची मदत विद्यार्थ्यांना संशोधनावर अधिक लक्ष केंद्रित करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

'बीआयटी' मेसरामध्ये विविध विषयांमध्ये संशोधनाच्या संधी उपलब्ध आहेत. समाजशास्त्र आणि मानसशास्त्र यांसारख्या ह्युमॅनिटीज विषयांसोबतच विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी संबंधित अनेक क्षेत्रांमध्ये पीएच. डी करता येते. संस्थेच्या माहितीनुसार, 'बीआयटी' मेसरामध्ये स्पेस टेक्नॉलॉजी विभाग सुरू करण्यात आला होता. या संस्थेत चांद्रयान-२शी संबंधित संशोधन कार्यही झाले आहे. याशिवाय रिमोट सेन्सिंगसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही संशोधनाच्या संधी उपलब्ध आहेत.

मेसरा कॅम्पसमध्ये मुलांसाठी आणि मुलींसाठी स्वतंत्र हॉस्टेलची व्यवस्था आहे. त्यामुळे विविध राज्यांमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांना कॅम्पसमध्ये राहून संशोधन करता येते. पीएच. डी. पूर्ण केल्यानंतर संशोधक विद्यार्थ्यांसाठी अध्यापन आणि संशोधन क्षेत्रात विविध संधी उपलब्ध होतात. 'बीआयटी' मेसरातून संशोधन पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना 'आयआयटी', 'एनआयटी' आणि 'आयआयटी'-'आयएसएम' धनबाद यांसारख्या नामांकित संस्थांमध्ये प्राध्यापक किंवा संशोधन क्षेत्रातील विविध पदांवर काम करण्याच्या संधी मिळू शकतात. 'जेआरएफ' नसल्यामुळे आर्थिक अडचणींना सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'बीआयटी' मेसराची ही शिष्यवृत्ती योजना त्यामुळे महत्त्वाची ठरणार आहे.

# इथे हजारो पर्यटक का जातात?


स्याब्रुबेसी (नेपाळ)


तिमुरे (नेपाळ)

भटकंती

नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुरामुळे संपूर्ण जगाचे लक्ष या देशाकडे वेधले गेले आहे. नेपाळ-चीन सीमेच्या जवळ हिमनदी तुटल्याने अचानक आलेला पूर आणि वेगाने वाहून आलेल्या मलब्यामुळे अनेक भाग उद्ध्वस्त झाले आहेत. या दुर्घटनेत स्थानिक नागरिकांसह मोठ्या संख्येने परदेशी पर्यटक आणि यात्रेकरूही प्रभावित झाले आहेत.

नेपाळ पर्यटन मंडळाच्या माहितीनुसार, नेपाळमध्ये बेपत्ता असलेल्या व्यक्तींमध्ये ५१७ परदेशी नागरिकांचा समावेश आहे. यामध्ये भारतासह ३० हून अधिक देशांमधील नागरिकांचा समावेश असल्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो, की अखेर एवढ्या दुर्गम आणि पर्वतीय भागात हजारो परदेशी पर्यटक पोहोचतात तरी का? नेपाळमध्ये जगातील सर्वाधिक उंच पर्वत आहेत. त्यामुळे अनेक दशकांपासून हे देश आंतरराष्ट्रीय पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र राहिले आहे. माऊंट एव्हरेस्टसह लांगटांग, अन्नपूर्णा, मनास्लू आणि अन्य पर्वतीय भाग जगभरातील ट्रेकर्सना आकर्षित करतात. ट्रेकिंग हा नेपाळच्या पर्यटनक्षेत्राचा, तसेच अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहे. नेपाळ सरकारच्या आकडेवारीनुसार, २०२४मध्ये ११.४७ लाखांहून अधिक परदेशी पर्यटकांनी नेपाळला भेट दिली होती.

पूरग्रस्त रसुवा जिल्ह्यालाही याच कारणामुळे विशेष महत्त्व आहे. स्याब्रुबेसी आणि तिमुरे ही ठिकाणे लांगटांग व्हॅली, तसेच तामांग हेरिटेज ट्रेलकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गांवर आहेत. तिबेटमध्ये जाणाऱ्या प्रवाशांसाठीही हा भाग महत्त्वाचा मार्ग मानला जातो.

या परिसरात परदेशी प्रवाशांची मोठी उपस्थिती असण्यामागे धार्मिक पर्यटन हे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. नेपाळमार्गे मोठ्या संख्येने भारतीय, तसेच इतर देशांतील यात्रेकरू कैलास मानसरोवर यात्रेसाठी जातात. नेपाळ-चीन सीमेच्या जवळील मार्ग या यात्रेतील महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामुळे या परिसरात केवळ ट्रेकर्सच नव्हे, तर विविध देशांतील यात्रेकरूही मोठ्या संख्येने आढळतात. पूर आला तेव्हा प्रभावित भागात पर्यटक आणि यात्रेकरूंची उपस्थिती असण्यामागे हेही एक प्रमुख कारण आहे.

परदेशी पर्यटकांसाठी नेपाळचे आकर्षण केवळ माउंट एव्हरेस्टपुरते मर्यादित नाही. बर्फाच्छादित पर्वत, सुंदर सरोवरे, बौद्ध मठ, हिंदू मंदिरे, घनदाट जंगले आणि स्थानिक ग्रामीण संस्कृती यांचा अनोखा संगम नेपाळमध्ये पाहायला मिळतो. अनेक पर्यटक शहरांपासून दूर असलेल्या छोट्या गावांमध्ये जाऊन होमस्टेच्या माध्यमातून स्थानिक जीवनशैलीचा अनुभव घेतात. रसुवा परिसरातील गोसायंकुंडसारखी धार्मिक तसेच नैसर्गिक स्थळेही पर्यटकांना मोठ्या प्रमाणात आकर्षित करतात. त्यामुळे सध्या पुराचा फटका बसलेल्या भागात पर्यटकांची उपस्थिती ही असामान्य घटना नव्हती. सामान्य परिस्थितीत हे भाग नेपाळमधील लोकप्रिय पर्यटन मार्गांचा अविभाज्य भाग आहेत; मात्र हिमालयीन प्रदेशाचे भौगोलिक स्वरूप आणि अचानक बदलणारे हवामान यामुळे अशा भागात प्रवास करताना नैसर्गिक आपत्तींचा धोका कायमच असतो.

## एआय मॅनिया




### 'मेटा'चे 'म्यूझ व्हॉइस ट्रान्स्क्राइब'

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आता केवळ आवाजाचे टेक्स्टमध्ये रूपांतर करण्यापुरती मर्यादित राहणार नाही, तर संभाषणादरम्यान बोलल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या भाषाही समजू शकणार आहे. 'मेटा'ने 'म्यूझ व्हॉईस ट्रान्स्क्राईब' नावाचे नवीन 'स्पीच-टू-टेक्स्ट मॉडेल' सादर केले आहे. हे मॉडेल संभाषण सुरू असतानाच आवाजाचे मजकुरात रूपांतर करू शकते. विशेष म्हणजे, एकाच संभाषणात वेगवेगळ्या भाषा वापरल्या गेल्या, तरी हे मॉडेल त्या समजून घेण्यास सक्षम आहे. म्यूझ व्हॉइस ट्रान्स्क्राईब ७०हून अधिक भाषांना समर्थन देते. यामध्ये भारतातील हिंदी, तमिळ, तेलुगू, मल्याळम आणि कन्नड या पाच प्रमुख भाषांचा समावेश आहे. संभाषणादरम्यान भाषा बदलली, तरीही ते समजून घेण्याची क्षमता या मॉडेलमध्ये आहे. म्यूझ व्हॉईस ट्रान्स्क्राईबचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'कोड-स्विचिंग'ला असलेले समर्थन. म्हणजेच, संभाषणादरम्यान एखादी व्यक्ती इंग्रजीतून भारतीय भाषेत किंवा एका भाषेतून दुसऱ्या भाषेत सहजपणे बोलू लागली, तरी हे मॉडेल ते ओळखू शकते. यासाठी वेगवेगळे मॉडेल किंवा अतिरिक्त प्रक्रिया करण्याची गरज भासणार नाही. भारतासारख्या बहुभाषिक देशात हे वैशिष्ट्य विशेष उपयुक्त ठरू शकते. दैनंदिन संभाषणात अनेक जण इंग्रजी आणि प्रादेशिक भाषांचा एकत्रित वापर करतात. अशा संभाषणाचे अचूक ट्रान्सक्रिप्शन करण्यासाठी हे तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरू शकते.

म्यूझ व्हॉइस ट्रान्स्क्राइब स्ट्रीमिंग ट्रान्सक्रिप्शन सुविधा देते. एखादी व्यक्ती बोलत जाईल, त्याच वेळी त्याचा मजकूर तयार होत जाईल. 'मेटा'च्या माहितीनुसार, हे मॉडेल २० हून अधिक व्यक्ती असलेल्या रेकॉर्डिंगमध्ये वेगवेगळ्या वक्त्यांचे आवाज ओळखू शकते. तसेच, एक तासापेक्षा जास्त कालावधीच्या रेकॉर्डिंगवरही ते प्रक्रिया करू शकते. म्यूझ व्हॉईस ट्रान्स्क्राईब प्रत्येक शब्दासाठी तो शब्द किती वेळ ऐकणे आवश्यक आहे, याचा अंदाज घेते. सोपे शब्द असल्यास ते वेगाने प्रतिसाद देते; तर कठीण शब्द ओळखण्यासाठी काहीसा अधिक वेळ घेऊ शकते. म्यूझ व्हॉईस ट्रान्स्क्राइबचा वापर मेटाच्या मॉडेल एपीआयच्या माध्यमातून करता येतो. मेटा एआय फॉर मॅक आणि म्यूझ कोडमध्ये डिक्टेशनसाठीही या मॉडेलचा वापर केला जात आहे. एपीआयसाठी १००० ऑडिओ मिनिटांसाठी २८५ रुपये आणि प्रतितास सुमारे १६ रुपये इतकी होते. पत्रकारिता, बैठका, ग्राहक सेवा, शिक्षण, संशोधन आणि वैयक्तिक डिक्टेशन अशा विविध क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर वाढण्याची शक्यता आहे.

# पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड

फॅशन पॅशन

एक काळ असा होता, की बहुतांश पुरुष आपल्या फॅशनविषयी फारसे चिंतित नसत; मात्र काळ बदलत गेला तसे पुरुषांमध्येही फॅशनविषयीची जागरूकता वाढली. यामागे कॉर्पोरेट क्षेत्रातील वाढती स्पर्धा हेही एक महत्त्वाचे कारण आहे. कार्यालयीन वातावरणात प्रत्येक व्यक्तीने नीटनेटके आणि प्रभावी दिसणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे पुरुषांच्या फॅशनमध्ये वेगाने बदल होत असून, डिझायनर्सही नवनवीन प्रयोग करण्यापासून मागे हटत नाहीत.

आरामदायी 'ॲथलीझर' पासून ते जेंडर-न्यूट्रल स्टाइलपर्यंतच्या फॅशनचा प्रभाव सध्या वाढताना दिसत आहे. पारंपरिक पोशाख आणि आधुनिक पाश्चिमात्य शैली यांचा मेळ घालण्याचा प्रयत्नही पुरुषांच्या फॅशनमध्ये ठळकपणे दिसून येत आहे.

**कुर्ता-जीन्सपासून नेहरू जॅकेटपर्यंत**

२०२६मध्ये विशेषतः पारंपरिक भारतीय आणि आधुनिक पाश्चिमात्य पोशाखांचे फ्युजन लोकप्रिय होत आहे. कुर्ता-जीन्स, स्टायलिश नेहरू जॅकेट यांसारख्या पोशाखांना तरुणांकडून पसंती मिळत आहे. हे पोशाख पारंपरिकतेचा स्पर्श कायम ठेवतानाच आधुनिक आणि आरामदायी लूक देतात. त्याचबरोबर टिकाऊ आणि 'मिनिमलिस्ट' फॅशनकडेही पुरुषांचा कल वाढत आहे. कमी पण आकर्षक कपडे, साधे डिझाइन आणि आरामदायी पोशाख यांना प्राधान्य दिले जात आहे. याचे प्रतिबिंब 'लॅक्मे फॅशन वीक-२०२६'मध्येही पाहायला मिळाले. यंदाच्या 'फॅशन वीक'मध्ये पुरुषांच्या फॅशनचा विशेष प्रभाव दिसून आला. 'द बॉईज क्लब'सह अनेक डिझायनर्सनी आधुनिक, बोल्ड आणि प्रयोगशील मेन्सवेअर सादर केले. रॅम्पवर धारदार कट्स, आकर्षक रंग, सिल्कचे कोट, ड्रेप्ड धोती पँट आणि एम्ब्रॉयडरी केलेल्या शेरवानीसोबतच जेंडर-न्यूट्रल फॅशनचा अनोखा संगम पाहायला मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात 'द बॉईज क्लब' या फॅशन कलेक्शनने झाली. विवेक करुणाकरन, कंट्रीमेड, ध्रुव वैश आणि साहिल अनेजा यांसारख्या डिझायनर्सनी स्टायलिश आणि आधुनिक 'मेन्सवेअर'ची नवी शैली सादर केली. दक्षिण भारतीय, तसेच बॉलिवूड अभिनेता सिद्धार्थने डिझायनर विवेक करुणाकरण यांच्या कलेक्शनसाठी रॅम्प वॉक केला. त्याने ब्राऊन सिल्क कोटसोबत ड्रेप्ड धोती पँट परिधान केली होती. पारंपरिक भारतीय पोशाखाला आधुनिक कट आणि स्टाइलची जोड देणारा हा लूक विशेष लक्षवेधी ठरला. यातून पुरुषांच्या फॅशनमध्ये आता केवळ कपड्यांची निवडच नव्हे, तर स्वतःची वेगळी ओळख आणि व्यक्तिमत्त्व व्यक्त करण्याची शैली विकसित होत असल्याचे स्पष्ट होते. पारंपरिक पोशाखांपासून आधुनिक आणि जेंडर-न्यूट्रल स्टाइलपर्यंतचा हा प्रवास पुरुषांच्या फॅशनविश्वात होत असलेल्या मोठ्या बदलाचे संकेत देतो.



# अमेरिकन कंपन्या देणार भारतातच काम?



रोजगारवाटा

अमेरिकेत काम करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारतीय आयटी व्यावसायिकांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. अमेरिकेच्या 'डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटी'ने नवीन एच-१ बी वर्क व्हिसा अर्जासाठी तब्बल १,०३,२६५ (सुमारे १८.६५ लाख रुपये) अतिरिक्त शुल्क आकारण्याचा प्रस्ताव दिला आहे.

सध्या लागू असलेला व्हिसा खर्च काही हजार डॉलर्सच्या घरात असताना थेट एक कोटी रुपयांपर्यंतची ही शुल्कवाढ अमेरिकन कंपन्यांच्या गणितात मोठा बदल घडवून आणू शकते. यामुळे कंपन्या कर्मचाऱ्यांना अमेरिकेत नेण्याऐवजी भारतातील केंद्रांमधूनच काम करून घेण्यावर भर देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या अमेरिकन कंपन्या भारतातून कर्मचाऱ्याला अमेरिकेत कसे न्यायचे? असा विचार करतात; पण एवढ्या मोठ्या शुल्कवाढीनंतर 'हेच काम थेट भारतातून करून घेता येईल का?' असा प्रश्न कंपन्या स्वतःला विचारू लागतील.

* 'जीसीसी'चा वाढता प्रभाव : भारतात सध्या १७००पेक्षा जास्त जीसीसी आणि सुमारे १९ लाख व्यावसायिक कार्यरत आहेत.

* डिजिटल डिलिव्हरी: सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), क्लाउड कॉम्प्युटिंग आणि डेटा सायन्स यांसारखी कामे बेंगळुरू, हैदराबाद किंवा पुणे येथून ऑनलाइन पद्धतीने सहज करता येतात.

कोणत्या क्षेत्रातील नोकऱ्या भारतात येऊ शकतात?

* मास्टेक या जागतिक डिजिटल कंपनीचे व्हीमल डांगरी यांच्या मते, डिजिटल स्वरूपात करता येणाऱ्या नोकऱ्यांचा विस्तार भारतात वाढू शकतो.

* या क्षेत्रांना फायदा : 'एआय', 'क्लाउड कॉम्प्युटिंग', 'डेटा नालिटिक्स', सायबर सिक्युरिटी आणि प्रॉडक्ट डेव्हलपमेंट.

* कमी शक्यता असलेले क्षेत्र : ज्या कामांसाठी थेट ग्राहकांच्या प्रत्यक्ष उपस्थितीची किंवा स्थानिक नियमांची आवश्यकता असते, अशा नोकऱ्या अमेरिकेतच राहतील.

**पुणे, बेंगळुरू अन् हैदराबादचा होणार फायदा**

भारतातील आयटी हब मानल्या जाणाऱ्या बेंगळुरू, हैदराबाद आणि पुणे या शहरांमधील 'जीसीसी इकोसिस्टम'ला या निर्णयाचा मोठा फायदा होऊ शकतो. 'नॅसकॉम'च्या आकडेवारीनुसार, भारतीय आयटी कंपन्यांनी गेल्या पाच वर्षांमध्ये एच-१ बी व्हिसावरील अवलंबित्व आधीच कमी केले आहे. त्यामुळे भारतातून टॅलेंट अमेरिकेत पाठवण्यापेक्षा, उच्च दर्जाचे काम भारतात आणणे हा नवीन ट्रेंड वेगाने सुरू होण्याची शक्यता आहे.

# अहिल्यानगरच्या रेल्वे प्रश्नांसाठी खासदार नीलेश लंके आक्रमक

**प्रकल्पांच्या कालमर्यादेची मागणी; पुणे-अहिल्यानगर लोकल, नवीन रेल्वे मार्ग, बंद पॅसेंजर सेवा आणि प्रवासी सुविधांचे प्रश्न रेल्वे स्थायी समितीच्या बैठकीत उपस्थित**

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील रेल्वे विकासाला गती मिळावी, प्रवाशांच्या सुरक्षिततेसह मूलभूत सुविधांचा विस्तार व्हावा आणि रखडलेल्या प्रकल्पांना निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावे, अशी आग्रही मागणी खासदार नीलेश लंके यांनी रेल्वे स्थायी समितीच्या बैठकीत केली. अहिल्यानगर जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांचे प्रश्न, नवीन रेल्वे सेवा, उड्डाणपूल व भुयारी मार्ग, शेतमाल वाहतुकीसाठी कार्गो टर्मिनल आणि स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी अशा विविध विषयांकडे त्यांनी समितीचे लक्ष वेधले.


स्थायी समितीच्या बैठकीत अहिल्यानगरच्या रेल्वे प्रश्नांकडे लक्ष वेधताना खा. निलेश लंके

रेल्वे प्रशासनाने केवळ आश्वासने न देता प्रत्येक प्रकल्पाची सद्यस्थिती, कामाची प्रगती आणि पूर्णत्वाची निश्चित तारीख जाहीर करावी, अशी भूमिका खासदार लंके यांनी मांडली. जिल्ह्यातील रेल्वे विकासाच्या मागण्या कागदोपत्री न राहता त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अहिल्यानगर तसेच दौंड-मनमाड रेल्वे मार्गावर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी 'कवच' स्वयंचलित रेल्वे सुरक्षा प्रणाली, ऑटोमॅटिक ट्रेन प्रोटेक्शन, आरएफआयडी टॅग, ऑप्टिकल फायबर केबल, ऑटोमॅटिक ब्लॉक सिग्नलिंग आणि इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी त्यांनी केली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून रेल्वे प्रवास अधिक सुरक्षित करण्याची आवश्यकता त्यांनी मांडली.

अहिल्यानगर रेल्वे स्थानक परिसरातील उपलब्ध रेल्वे जमिनीचा वापर करून गती शक्ती कार्गो टर्मिनल, शेतमाल लॉजिस्टिक हब आणि कंटेनर डेपो उभारण्याचा मुद्दाही खासदार लंके यांनी उपस्थित केला. कांदा, दूध, भाजीपाला आणि अन्य कृषी उत्पादनांच्या वाहतुकीसाठी या सुविधा उपयुक्त ठरू शकतात. त्यातून शेतकऱ्यांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध होण्यासह स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. रेल्वे परिसरात किऑस्क आणि रिक्षा स्टँडसाठी जागा उपलब्ध करून स्थानिक तरुणांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी देण्याची मागणीही त्यांनी केली.

अहिल्यानगर-पुणे, छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर आणि कल्याण-मुरबाड या प्रस्तावित रेल्वे मार्गांच्या सविस्तर प्रकल्प अहवालासाठी (डीपीआर) निश्चित कालमर्यादा जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली. रेल्वे विकास निगम लिमिटेड (आरव्हीएनएल) आणि इरकॉन यांच्या कामांचे मूल्यमापन करावे, तसेच अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर अमृत भारत योजनेंतर्गत झालेल्या कामांच्या दर्जाची चौकशी करावी, असे मुद्देही त्यांनी मांडले. अहिल्यानगर एमआयडीसीतील स्थानिक लघुउद्योजकांना रेल्वेच्या पुरवठा साखळीत संधी मिळावी, यासाठीही पाठपुरावा करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

निंबळक येथील रेल्वे गेट क्रमांक ३०, विळद, वांबोरी, अरणगाव आणि श्रीगोंदा साखर कारखाना परिसरातील रेल्वे उड्डाणपूल व भुयारी मार्गांची कामे मार्गी लावण्याची मागणी खासदार लंके यांनी केली. या प्रकल्पांची सद्यस्थिती स्पष्ट करून काम सुरू होण्याची आणि पूर्ण होण्याची तारीख निश्चित करावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

पुणे-अहिल्यानगरदरम्यान डेमू किंवा ईएमयू लोकल सेवा सुरू करण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करावा, तसेच अहिल्यानगरहून जयपूर आणि खाटू श्यामसाठी रेल्वे सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. पुणे-लखनऊ, पुणे-गोरखपूर, यशवंतपूर-चंदीगड आणि संपर्क क्रांती यांसारख्या गाड्यांना अहिल्यानगर स्थानकावर थांबा देण्याचा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. बेलवंडी व विसापूर स्थानकांवर महत्त्वाच्या गाड्यांना थांबे देण्यासह कोरोना काळात बंद झालेल्या नांदेड-दौंड, मनमाड-पुणे आणि शिर्डी-मुंबई पॅसेंजर सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली. अहिल्यानगर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक दोन व तीनसाठी केडगाव बाजूने स्वतंत्र स्टेशन इमारत आणि प्रवेशद्वार उभारावे, अशी मागणीही खासदार लंके यांनी केली. स्थानकावर लिफ्ट, एस्कलेटर, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र प्रतीक्षागृहे उपलब्ध करून देण्यासह ड्रेनेजची समस्या, दुर्गंधी, मोकाट कुत्रे आणि रणगाडा परिसरातील अस्वच्छता दूर करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी नमूद केले. आरक्षण व चौकशी खिडकीच्या वेळा पूर्ववत सकाळी आठ ते रात्री आठपर्यंत करण्याची मागणीही करण्यात आली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील रेल्वे संपर्काचा विस्तार, प्रवाशांची सुरक्षितता, शेतमाल वाहतूक आणि स्थानिक रोजगार या बाबींना प्राधान्य देऊन रेल्वे प्रशासनाने ठोस कार्यवाही करावी, यासाठी संसदीय समितीच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी स्पष्ट केले.



## गुरुवाणी – ७९
## 'अभय' दान

तीर्थंकरांची स्वतःला आलेली अनुभूती व्यक्त करताना सुधर्मा स्वामींनी बाहेरच्या अनेक उपमा दिल्या. भगवती सूत्रात एक चर्चा आहे. प्राणी कशामुळे अधिक दुःखी आहे. याचे उत्तर मिळते, भीतीमुळे सर्वाधिक दुःख असते. जीवनात जितक्या चुका होतात, याचे मूळ कारण भीती असते. भयमुक्त जीव पाप नाही करू शकत आणि भययुक्त जीव शंभर टक्के धर्माचरण करू शकत नाही. सगळा संसार भीतीच्या आधारावर घालतो. प्रत्येकाच्या मनात सगळ्यात मोठी भीती असते, लोक काय म्हणतील? ही भीती एकटे उभं राहू देत नाही. जवळचे लोकच तुम्हाला भयभीत करतात. आपले नाराज झाले तर आपण एकटे पडू ही भीती असते. नऊ प्रकारच्या पुण्यात सर्वश्रेष्ठ पुण्य नमस्कार पुण्य असते. कारण ते सर्वस्वी आपले असते. आपण बाहेरून भीती घेतली तर भीतीच देतो. जे आतमध्ये नाही ते देऊ शकत नाही. सगळे जीव भीतीने पिडीत आहे. सगळ्यांना मृत्युची भीती सर्वाधिक वाटते. जे होणार आहे त्याची तयारीच आपण करत नाही. सुधर्मा स्वामी प्रथम जेव्हा तीर्थंकरांच्या चरणी लीन होण्यासाठी गेले तेव्हा त्यांच्याही मनात भीतीच होती. पण जसे त्यांनी तीर्थंकरांना पाहिले त्यांच्या मनातील भीती दूर झाली. त्यांनी जेव्हा तीर्थंकरांचे जीवन चरित्र अनुभवले तेव्हा त्यांना कळले की, तीर्थंकर जिथे जिथे गेले तिथली भीती, दहशतीचे वातावरण त्यांनी समूळ नष्ट केले. राजा श्रेणिक, चंडकौशिकचे भय त्यांनी समाप्त केले. कितीतरी लोकांना तीर्थंकरांनी अभय दान दिले. सगळ्यात मोठे 'अभय' दान त्यांनी जगाला दिले. आपल्या परिवारात भयाचे राज्य असते. ते दूर केले पाहिजे. ज्याची भीती वाटते त्याच्या पासून आपण दूर जातो, त्याला शत्रू म्हणतात. आपण ज्याच्या जवळ जातो त्याला मित्र म्हणतात. परिवारातही एकमेकांची भीती वाटणे दूर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तीर्थंकरांनी सत्य बोलण्यासाठी अट ठेवली आहे. असे सत्य बोला की ते बोलण्याने समोरच्याला भीती नाही वाटले पाहिजे. कोणाचेही रहस्य कधीच प्रकट करायचे नाही. जर असे केले तर सत्य सुद्धा पाप होते. सत्य बोलताना अहंकार नसावा. अन्यथा ते दोघांसाठीही अकल्याणकारी असते. तीर्थंकर सगळे जाणून होते पण सगळं बोलत नव्हते. ते असेच सत्य बोलायचे ज्यामुळे समोरच्याच्या जीवनात सुधार होईल. हा नियम तुम्ही घरात पाळला तर कोणतीही वास्तू शांती करायची गरज पडणार नाही.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**


भाजपच्या महिला आघाडीच्या वतीने खासदार डॉ. अंगोमचा बिमोल अओकेइजाम यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी निषेध आंदोलन करण्यात आले.

# भाजपच्या पदाधिकाऱ्यांची दिल्लीगेट येथे घोषणाबाजी

नगर – काँग्रेसचे खासदार डॉ. अंगोमचा बिमोल अओकेइजाम यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील ११ विद्यार्थिनींवर केलेल्या लैंगिक छळ प्रकरणाच्या निषेधार्थ नगर शहर भाजपच्या महिला आघाडीच्या वतीने दिल्लीगेट येथे घोषणा देऊन आंदोलन करण्यात आले. भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते व महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात विरोधीपक्ष नेते खा.राहुल गांधी व खा.डॉ. अंगोमचा बिमोल अओकेइजाम यांच्या मुर्दाबादच्या घोषणा देऊन राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

अनिल मोहिते म्हणाले, डॉ. अंगोमचा बिमोल अओकेइजाम या नराधमाने ११ विद्यार्थिनींवर केलेल्या लैंगिक छळाचा आरोप अधिकृत चौकशीत सिद्ध झाला आहे. यामुळे नैतिकतेच्या गप्पा मारणाऱ्या काँग्रेस पक्षाचा बुरखा फाटला आहे. त्यांनी लोकशाहीचे तत्वे पायमल्ली तुडवले आहेत. त्यामुळे खा.राहुल गांधी व खा.डॉ. अंगोमचा बिमोल अओकेइजाम यांनी ताबडतोब राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी केली.

प्रिया जानवे म्हणाल्या, जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील ११ विद्यार्थिनीं काँग्रेच्या या नराधम खासदाराने अत्याचार करून माणुसकीला काळीमा लावली आहे. आशा नराधमाला काँग्रेस पाठीशी घालत आहे. त्याला केवळ विद्यापीठातून बरखास्त करून चालणार नाहीतर त्याला कायमचे निलंबित करावे व पक्षातुन हकालपट्टी करावी. अन्यथा भाजपच्या महिला शांत बसणार नाही.

आंदोलनास महिला आघाडीच्या स्वाती शिरसुल, स्वाती पवळे, उज्वला भांगे, मीना गोयल, सविता कोटा, संध्या पावसे, चंद्रकला गोयल, जिल्हा सरचिटणीस अशोक गायकवाड, राजेंद्र फुलारे, रामदास आंधळे, देवेंद्र दुधाले, महावीर कांकरिया, कैलास गीते, तुषार बोरुडे, हर्षल बोरा, श्रीकांत फंड, देवेंद्र बंब व संजय गायकवाड उपस्थित होते.

# अहिल्यानगरमध्ये १६ ऑक्टोबरला 'क्रांती' मराठी चित्रपट प्रदर्शित होणार

**डॉ. अर्जुन शिरसाठ यांची बहुआयामी भूमिका; अभिनेत्री प्रियांका खोलगडे आणि ॲड. महेश देवकाते झळकणार**



नगर – मराठी चित्रपटसृष्टीत अहिल्यानगरच्या कलाविश्वाची नवी ओळख निर्माण करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेला 'क्रांती' हा मराठी चित्रपट १६ ऑक्टोबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे लेखन, कथा, पटकथा, संवाद, गीत, संगीत, संकलन, दिग्दर्शन आणि निर्मिती अशा विविध जबाबदाऱ्या पेलणारे अहिल्यानगरचे नेत्रतज्ज्ञ डॉ. अर्जुन आनंद शिरसाठ यांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले आहे.

'क्रांती' चित्रपटात मुंबईच्या अभिनेत्री प्रियांका खोलगडे प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. ॲड. महेश देवकाते ऊर्फ पत्री सरकार हे कडकशिस्तीच्या खलनायकाची भूमिका साकारताना दिसतील. चित्रपटाचे क्रिएटिव्ह डायरेक्टर म्हणून रमेश चौधरी यांनी काम पाहिले आहे. 'पाणीपुरी', 'सालबर्डी', 'गुल्हर' आणि 'बाबा' या चित्रपटांशीही त्यांचे नाव जोडले गेले आहे.

### चित्रपटात सामाजिक विषयाची प्रभावी मांडणी

'क्रांती' हा सामाजिक विषयावर आधारित चित्रपट असून, प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत स्वतःचे अस्तित्व आणि क्षमता सिद्ध करणाऱ्या स्त्रीची कथा यात मांडण्यात आली आहे. संकटांचा धैर्याने सामना करणे, स्वतःची कर्तव्ये पार पाडणे आणि सामाजिक व नैतिक जबाबदारीचे भान जपणे, हा चित्रपटाचा प्रमुख आशय आहे.

अत्याचारामुळे पीडित महिला आणि त्यांच्या कुटुंबीयांवर होणारे गंभीर परिणाम, तसेच अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी कठोर कायद्यांची आवश्यकता, हे विषयही चित्रपटातून मांडण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा संदर्भ घेत अन्याय करणाऱ्यांविरुद्ध कठोर भूमिका घेण्याचा संदेश चित्रपटातून देण्यात आला आहे. चित्रपटात अहिराणी भाषेतील गाण्याचाही समावेश हे विशेष आकर्षण आहे. माहनी बायको बायको, बायको देखणा दिवा...! हे गाणे प्रेक्षकांना ऐकायला मिळणार असून, मराठी चित्रपटात अहिराणी गाण्याचा अशा प्रकारे समावेश झाल्याचे डॉ. शिरसाठ यांनी सांगितले.

### अहिल्यानगरच्या कलाकारांना संधी

'क्रांती'चे चित्रीकरण अहिल्यानगर परिसरातील विविध ठिकाणी करण्यात आले आहे. न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल कॉलेज, विळट घाट, प्रहार अॅकेडमी, डॉ. सुंदरराव मोरे आणि राजश्री घुले यांच्या निवासस्थानी, तसेच मांजरसुंबा परिसरात चित्रीकरण झाले आहे.

या चित्रपटात माधव अभ्यंकर, पुष्पा चौधरी यांच्यासह अहिल्यानगरमधील अनेक स्थानिक कलाकारांना अभिनयाची संधी मिळाली आहे. श्याम शिंदे, डॉ. तुषार कराड, फलटवी शेठ, तेजस आंधळे, राहुल सुराणा, शुभम निर्मळ, अक्षदा वर्णा, साक्षी देवकर आणि अतुल यांनी विविध भूमिका साकारल्या आहेत.

### दिवंगत पुत्राच्या स्वप्नपूर्तीसाठी चित्रपटाची निर्मिती

'क्रांती'च्या निर्मितीमागे डॉ. अर्जुन शिरसाठ यांची भावनिक कहाणी आहे. त्यांचे दिवंगत पुत्र अभिषेक याला लहानपणापासूनच चित्रपट निर्मितीची विशेष आवड होती. चित्रपट पाहताना तो केवळ कथानकापुरता मर्यादित न राहता कॅमेरा, संपादन, शॉटस् आणि दृश्यांची परिणामकारक मांडणी यांचे बारकाईने निरीक्षण करायचा.

अभिषेकने पियानोचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले होते. संगीत आणि चित्रपटांविषयीची त्याची जाण लक्षात घेऊन डॉ. शिरसाठ यांनी त्याचे स्वप्न पुढे नेण्याचा संकल्प केला. अभिषेकच्या अकाली निधनानंतर त्याला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आणि त्याचे चित्रपट निर्मितीचे स्वप्न साकार करण्यासाठी 'क्रांती' चित्रपटाची निर्मिती करण्यात आली. वाचनाची आवड, साहित्याचा अभ्यास आणि विविध विषयांचे निरीक्षण यातून डॉ. शिरसाठ यांची वैचारिक जडणघडण झाली. वैद्यकीय व्यवसाय सांभाळतानाच चित्रपट निर्मितीची आवड त्यांनी जोपासली. 'क्रांती'च्या माध्यमातून अहिल्यानगरमधील कलाकार आणि चित्रीकरणस्थळांना व्यापक व्यासपीठ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# अहिल्यानगरच्या हुंडेकरी अॅकॅडमीचे दोन खेळाडू महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात निवड

**किरण चोरमले महाराष्ट्राच्या U-23 संघाचा कर्णधार; अश्कान काझीचाही संघात समावेश**

नगर – शहरातील हुंडेकरी स्पोर्ट्स ॲकॅडमीचे क्रिकेटपटू किरण चोरमले आणि अश्कान काझी यांची भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या कर्नल सी. के. नायडू ट्रॉफी २०२६-२७ स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या २३ वर्षांखालील क्रिकेट संघात निवड झाली आहे. या निवडीमध्ये विशेष अभिमानाची बाब म्हणजे किरण चोरमले याच्यावर महाराष्ट्राच्या २३ वर्षांखालील संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. दोन्ही खेळाडूंनी आपल्या मेहनतीच्या जोरावर आपली गुणवत्ता सिध्द केली आहे.

किरण चोरमले हा उजव्या हाताचा मधल्या फळीतील फलंदाज असून तो उजव्या हाताने फिरकी गोलंदाजीही करतो. फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही क्षेत्रांतील कौशल्याच्या जोरावर त्याने क्रिकेटमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. विशेष म्हणजे, किरणने यापूर्वी महाराष्ट्राच्या १४, १६, १९ आणि २३ वर्षांखालील विविध वयोगटांतील संघांचे प्रतिनिधित्व केले आहे. सातत्यपूर्ण कामगिरी, खेळातील शिस्त, नेतृत्वगुण आणि अनुभवाच्या बळावर त्याने महाराष्ट्राच्या युवा क्रिकेटमध्ये महत्त्वाचे स्थान मिळविले आहे.


किरण चोरमले


अश्कान काझी

किरणच्या क्रिकेट कारकिर्दीतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे त्याने यापूर्वी महाराष्ट्राच्या १९ वर्षांखालील संघाचे कर्णधारपद भूषविले आहे. तसेच, आशिया कप स्पर्धेत भारतीय १९ वर्षांखालील संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधीही त्याला मिळाली होती. १९ वर्षांखालील विश्वचषकासाठी भारतीय संघाच्या राखीव खेळाडूंमध्येही त्याचा समावेश झाला होता. आता महाराष्ट्राच्या २३ वर्षांखालील संघाचे नेतृत्व करण्याची संधी त्याला प्राप्त झाली आहे.

दरम्यान, अश्कान काझी याचीही महाराष्ट्राच्या २३ वर्षांखालील संघात निवड झाल्याने अहिल्यानगरच्या क्रिकेट क्षेत्राला आणखी एक यश मिळाले आहे. अश्कान हा डावखुरा मधल्या फळीतील फलंदाज असून त्यानेही महाराष्ट्राच्या १४, १६, १९ आणि २३ वर्षांखालील संघांचे प्रतिनिधित्व केले आहे. विविध वयोगटांतील क्रिकेट स्पर्धांमधून मिळालेला अनुभव आणि सरावातील सातत्य यांच्या बळावर त्याने ही महत्त्वपूर्ण संधी मिळविली आहे. राज्याच्या युवा संघात एकाच अॅकॅडमीतील दोन खेळाडूंची निवड होणे, ही संबंधित अॅकॅडमीसह जिल्ह्याच्या क्रिकेट क्षेत्रासाठी गौरवाची बाब मानली जात आहे.

दोन्ही खेळाडू अहिल्यानगर येथील हुंडेकरी स्पोर्ट्स अकॅडमी मध्ये प्रशिक्षक सरफराज बांगडीवाले आणि वसीम हुंडेकरी यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करतात. प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण मेहनत, तांत्रिक कौशल्यांचा विकास आणि स्पर्धात्मक क्रिकेटचा अनुभव यांमुळे त्यांच्या खेळाला अधिक प्रतिभा मिळाली आहे. याशिवाय, हे दोन्ही खेळाडू अहिल्यानगर जिल्हा क्रिकेट संघाचे नियमित खेळाडू असून, जिल्ह्यातील क्रिकेटला राज्यस्तरावर ओळख मिळवून देण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरत आहे.

कर्नल सी. के. नायडू ट्रॉफीसारख्या महत्त्वपूर्ण स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात स्थान मिळविणे, ही खेळाडूंच्या कारकिर्दीतील उल्लेखनीय कामगिरी आहे. त्यातच किरण चोरमले याची कर्णधारपदी निवड झाल्याने त्याच्या नेतृत्वगुणांवर आणि क्षमतेवर विश्वास व्यक्त झाला आहे. आगामी स्पर्धेत दोन्ही खेळाडू आपली गुणवत्ता सिद्ध करून महाराष्ट्राच्या संघाला यश मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहतील, अशी अपेक्षा हुंडेकरी अॅकॅडमीच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

या यशाबद्दल अहिल्यानगर जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष तथा आमदार संग्राम जगताप आणि संघटनेचे सचिव गणेश गोंडाळ यांनी किरण चोरमले व अश्कान काझी यांचे अभिनंदन केले.


लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या सारसनगर शाखेत नवदुर्गा पूजन उत्साहात झाले.

# 'लिटिल फ्लॉवर' स्कूलमध्ये नवदुर्गा पूजन उत्साहात

नगर – आदिशक्तीच्या पूजनाचा नवरात्र उत्सव सर्वत्र उत्साहात साजरा होत आहे. देवींच्या विविध रूपांची मनोभावे पूजा केली जात आहे. लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या सारसनगर शाखेत मंगळवारी नव दुर्गा पूजनाचा कार्यक्रम झाला. चिमुकल्या मुलींनी नव दुर्गांची वेशभूषा परिधान करून कार्यक्रमात सहभाग घेतला.

यावेळी प्रमुख अतिथी माधवी गांधी, शाळेच्या संचालिका मनिषा बोगावत, संचालक विशाल बोगावत, शिक्षिका उपस्थित होत्या. नव दुर्गा पूजा करून सर्व मुलांना गिफ्ट देण्यात आले. शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी, सिद्धिदात्री या नवदुर्गांचे पूजन नवरात्रीत नऊ दिवस केले जाते. राक्षस वध करणाऱ्या देवीचे रूपही यावेळी साकारण्यात आले.

माधवी गांधी म्हणाल्या, लिटिल फ्लॉवर प्री स्कूल केवळ शाळा नसून मुलांसाठी एक मोठे संस्कार केंद्र आहे. मनिषा बोगावत या दोन दशकांपासून भावी पिढ्या घडवण्याचे काम करत आहेत. क्रमिक शिक्षण देतानाच मुलांमध्ये आपल्या परंपरा, आध्यात्म, संस्कार रूजवण्याचे कार्य केले जाते.

मनिषा बोगावत म्हणाल्या, लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या चारही शाखांमध्ये सर्व सण उत्सव साजरे केले जातात. सारसनगर शाखेत नवदुर्गा पूजन कार्यक्रम घेऊन मुलांना देवीच्या विविध रुपांची ओळख करून देण्यात आली. स्त्री शक्तीचा जागर करण्यात आला. अशा कार्यक्रमांतून मुलांना आपल्या परंपरा, संस्कृतीशी जोडले जाते. सर्व उपक्रमांना पालकांचे मोठे सहकार्य लाभते.

विशाल बोगावत यांनी आभार मानले. आगामी दिवाळीनिमित्त तेजस बोगावत यांनी मुलांसाठी ३१ ऑक्टोबर रोजी दिवाळी दिवा मेकिंग आणि १ नोव्हेंबर रोजी तोरण मेकिंग कार्यशाळा सारसनगर येथील आर्ट व्हिला स्टुडिओ मध्ये आयोजित केली आहे. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी संपर्क: ८००७५१५९००.

# 'सौर संवाद २०२६' यात्रेचे अहिल्यानगर येथे उद्घाटन



नगर – सौर ऊर्जेबाबत जनजागृती करण्यासह या क्षेत्रातील उद्योजकता आणि रोजगाराच्या संधी ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यासाठी गोपाल काबरा फाउंडेशन आणि जीके एनर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सौर संवाद २०२६' यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. १२ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत ही यात्रा १४ जिल्ह्यातून जाणार आहे. यात्रेचा शुभारंभ १२ ऑक्टोबरला अहिल्यानगर येथून झाला व त्यानंतर ही यात्रा छत्रपती संभाजीनगर येथे पोहोचली.

महाराष्ट्रातील १४ शहरांमधून जाणाऱ्या या यात्रेचा प्रारंभ अरणगाव रोड येथील बडीसाजन हॉलमध्ये उत्साहात झाला. याप्रसंगी जिल्ह्यातील सोलरचे डिलर, व्यावसायिक आणि विक्रेते उपस्थित होते. ही यात्रा १३ ऑक्टोबरला नाशिक आणि धुळे येथे, १४ ऑक्टोबरला बुलढाणा व अमरावती येथे, १५ ऑक्टोबरला भंडारा व चंद्रपूर येथे, १६ ऑक्टोबरला वाशीम, नांदेड, लातूर येथे, १७ ऑक्टोबरला सोलापूर आणि कोल्हापूर येथे सौर ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ, व्यावसायिकांशी संवाद साधणार आहे. पुणे येथे १८ ऑक्टोबरला या संवाद यात्रेचा समारोप होणार आहे. यात्रेद्वारे राज्यातील ३४ जिल्ह्यांतील इच्छुक उद्योजकांना जोडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

उद्घाटनप्रसंगी जीके एनर्जीचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक गोपाल काबरा म्हणाले, सौर ऊर्जेचा वापर केवळ वीज निर्मितीपुरता मर्यादित न ठेवता त्यातून स्थानिक व्यवसाय, रोजगार आणि आर्थिक संधी निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या यात्रेदरम्यान विशेषतः युवक आणि महिलांना सौर ऊर्जा क्षेत्रातील व्यवसायाच्या संधींची माहिती देऊन त्यांना उद्योजकतेसाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. एक हजारांहून अधिक इच्छुक उद्योजकांना सक्षम करण्याचे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. सौर ऊर्जेच्या वापरासाठी केंद्र सरकारने व महाराष्ट्र सरकारने अनेक प्रोत्साहनपर योजना जाहीर केल्या आहेत, या यात्रेमुळे सरकारी योजनांनाही चालना मिळणार आहे. सौर ऊर्जेच्या क्षेत्रात महाराष्ट्र प्रगतीपथावर असून, भारतात दुसऱ्या स्थानी असल्याचेही काबरा यांनी नमूद केले.

घरगुती छतावरील (रुफटॉप) सौर यंत्रणा, व्यावसायिक सौर प्रकल्प, सौर कृषिपंप, ऊर्जा साठवण, यंत्रणा बसविणे, देखभाल आणि वितरण अशा विविध क्षेत्रांतील संधींची माहिती देण्यात येत आहे. तसेच विक्री, सेवा आणि तांत्रिक कामांसाठी स्थानिक पातळीवर व्यवसाय कसा सुरू करता येईल, याबाबत व्यावहारिक मार्गदर्शन केले जाईल. सौर ऊर्जेच्या माध्यमातून जिल्हास्तरावर उद्योजकांचे जाळे निर्माण करून स्थानिक रोजगार वाढविणे आणि पर्यावरणपूरक ऊर्जेचा प्रसार वेगाने करणे, हा या यात्रेमागील व्यापक दृष्टिकोन आहे. या क्षेत्रातील अनुभव आणि ज्ञान इच्छुक उद्योजकांपर्यंत पोहोचवून त्यांना शाश्वत व्यवसाय उभारण्यासाठी प्रोत्साहन देण्यावरही भर दिला जाणार आहे, असे आयोजकांनी माहिती दिली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

